# महिलांचे हक्क व कल्याण समिती

**(२०१५-२०१६)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

जिल्हा परिषद, औरंगाबाद /औरंगाबाद, महानगरपालिका
यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व
पदोन्नती आणि औरंगाबाद, जिल्हा परिषदेतर्फे/औरंगाबाद, महानगरपालिकेतर्फे
त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा

## चौथा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
**२०१६**



# महिलांचे हक्क व कल्याण समिती

**(२०१५-२०१६)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

जिल्हा परिषद, औरंगाबाद /औरंगाबाद, महानगरपालिका
यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व
पदोन्नती आणि औरंगाबाद, जिल्हा परिषदेतर्फे /औरंगाबाद, महानगरपालिकेतर्फे
त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा

## चौथा अहवाल

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**सन २०१५-२०१६**

**समिती प्रमुख**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(७) श्री.प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश घोलप, वि.स.स.

(९) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स.

(१०) श्रीमती संध्यादेवी कुपेकर, वि.स.स.

(११) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(१३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१४) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(१५) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव





श्रीमती मा. म. सुर्वे, कक्ष अधिकारी.

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**सन २०१३-२०१४**

**समिती प्रमुख**

(१) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती नंदिनी देशमुख-पारवेकर, वि.स.स.

(३) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

(४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.

(५) श्रीमती शामल बागल, वि.स.स.

(६) श्री. गिल्बर्ट मेंडोसा, वि.स.स.

(७) श्रीमती संध्यादेवी देसाई ऊर्फ कुपेकर,वि.स.स.

(८) श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, वि.स.स.

(९) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(१०) श्रीमती मिरा रेंगे-पाटील, वि.स.स.

(११) डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स.

(१२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(१३) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

(१४) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१५) डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
| --- | --- | --- |
| **(१)** | **प्रस्तावना** | **(सात)** |
| **(२)** | **अहवाल** | **(नऊ)** |
| **(३)** | **औरंगाबाद, जिल्हा परिषद** | **१** |
| | १.१ औरंगाबाद, जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | १ |
| | १.२ औरंगाबाद, जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक व महिलांसाठी कल्याणकारी योजना | ७ |
| | १.३ महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याबाबत | १९ |
| | १.४ जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या अंगणवाड्यांचा दर्जा सुधारण्याबाबत | २७ |
| | १.५ शासकीय वसतिगृह पद्मपुरा | ३१ |
| | १.६ सावित्रीबाई महिला वसतिगृह | ३३ |
| **(४)** | **औरंगाबाद, महानगरपालिका** | |
| | २.१ औरंगाबाद, महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | ४० |
| | २.२ महिलांवरील होणाऱ्या अन्यायाबाबत तसेच तक्रार निवारण कक्ष | ४४ |
| | २.३ औरंगाबाद, महानगरपालिकेचे अंदाजपत्रक व महिलांसाठी कल्याणकारी योजना | ४८ |
| | २.४ महानगरपालिका क्षेत्रात असलेले शॉपिंग गाळे | ५३ |
| **(५)** | **परिशिष्ट-(अ) - शासन निर्णय** | **५७** |
| **(६)** | **परिशिष्ट-(ब) - बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | **८७** |




**प्रस्तावना**

मी महिलांचे हक्क व कल्याण समितीची समिती प्रमुख, समितीने आपल्या वतीने अधिकार दिल्यावरून समितीचा हा चौथा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**"औरंगाबाद, जिल्हा परिषद व औरंगाबाद, महानगरपालिका यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच जिल्हा परिषदेतर्फे / महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना"** यासबंधी समितीने माहिती जाणून घेण्याचे ठरविले. त्यानुसार औरंगाबाद, जिल्हा परिषद व औरंगाबाद, महानगरपालिका संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १० जुलै २०१४ रोजी औरंगाबाद, जिल्हा परिषद व दिनांक ११ जुलै २०१४ रोजी औरंगाबाद, महानगरपालिका येथे भेट दिली. जिल्हा परिषदेकडून व महानगरपालिकेकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, गृह विभाग, सचिव, नगरविकास विभाग (१) व (२), सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, उद्योग विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग व सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांची दिनांक ०४ नोव्हेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपलब्ध झालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने त्यासंदर्भात आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

प्रश्नावलीनुसार औरंगाबाद, जिल्हा परिषदेकडून व औरंगाबाद, महानगरपालिकेकडून प्राप्त झालेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती, शासन निर्णय तसेच समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त दिलेले आहे.

समितीच्या दिनांक एप्रिल २०१६ रोजी झालेल्या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार करून तो संमत करण्यात आला.

साक्षीच्या वेळी सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, गृह विभाग, सचिव, नगरविकास विभाग (१) व (२), सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, उद्योग विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग व सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग तसेच औरंगाबाद, जिल्हा परिषदेच्या व औरंगाबाद, महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहाय्य केल्याबाबत समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक एप्रिल २०१६.

**श्रीमती मनिषा चौधरी,**
समिती प्रमुख,
महिलांचे हक्क व कल्याण समिती.

## अहवाल

### " औरंगाबाद, जिल्हा परिषद व औरंगाबाद, महानगरपालिका "

महिलांचे हक्क व कल्याण समितीने **" औरंगाबाद, जिल्हा परिषद व औरंगाबाद, महानगरपालिका सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच जिल्हा परिषदेतर्फे /महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबाविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना"** यासंबंधी माहिती जाणून घेण्याचे तसेच औरंगाबाद, जिल्हा परिषद व औरंगाबाद, महानगरपालिका येथे भेट देण्याचे ठरविले त्यानुसार औरंगाबाद, जिल्हा परिषद व औरंगाबाद, महानगरपालिका तसेच संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १० जुलै, २०१४ रोजी औरंगाबाद, जिल्हा परिषद व दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी औरंगाबाद, महानगरपालिका येथे भेट दिली. औरंगाबाद, जिल्हा परिषद व औरंगाबाद, महानगरपालिका यांचेकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद, जिल्हा परिषद व आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी उपस्थित राहून समितीस माहिती दिली.

महिलांचे हक्क व कल्याण समितीने **" सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच जिल्हा परिषदेतर्फे /महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबाविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना"** यासंबंधी माहिती जाणून घेण्याचे ठरविले. तसेच येथे भेट देण्याचे ठरविले त्यानुसार संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी यांनी उपस्थित राहून समितीस माहिती दिली.



## १. औरंगाबाद, जिल्हा परिषद

### १.१ औरंगाबाद, जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :

दिनांक १० जुलै, २०१४ रोजी समितीने दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने औरंगाबाद, जिल्हा परिषदेकडून प्रश्नावलीच्या संदर्भात माहिती मागविण्यात आली.

त्या अनुषंगाने औरंगाबाद, जिल्हा परिषदेतील रिक्त पदाचा अनुशेष भरण्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत, महिलांचे ३० टक्के आरक्षण भरण्याबाबतची कार्यपद्धती, जिल्हा परिषदेमध्ये शासकीय, निम शासकीय व शासन अनुदानित सेवांमधील भर्तीसाठी महिलांकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अमंलबाजावणी जिल्हा परिषदेच्या सेवामधील भर्ती करतांना करण्यात येते काय ? असल्यास, त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इत्यादी बाबत सविस्तर माहिती देण्याबाबत तसेच जिल्हा परिषदेच्या अखत्यारित किती रुग्णालये आहेत ? त्यात किती अधिकारी व कर्मचारी आहेत ? त्यात महिलांची ३० टक्के नियुक्ती करण्यात आली आहे काय ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी औरंगाबाद, जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

जिल्हा परिषदेच्या सेवेमध्ये सरळसेवेसाठी महिलांकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याबाबत शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक नियुक्ती/१०९४/प्र.क्र.५७४/१२, दिनांक १५ मे १९९५ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे सरळसेवा भरती करताना शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात येते. महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ नुसार सेवाप्रवेश नियम शासनाने निश्चित केलेले आहेत.

वर्ग-१ व वर्ग-२ मधील सर्व पदे जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येत नाहीत. वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार जिल्हा निवड समितीमार्फत भरण्यात येतात. उपलब्ध रिक्त पदानुसार ३० टक्के महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात येतात.

| अ.क्र | संवर्ग | मंजुर पदसंख्या | | महिलांसाठी ३० टक्के आरक्षण प्रमाणे येणारी पदसंख्या | | आरक्षित पदांपैकी भरलेली पदसंख्या | | महिलांसाठी आरक्षित पदापैकी शिल्लक अनुशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रिक | अतांत्रिक | तांत्रिक | अतांत्रिक | तांत्रिक | अतांत्रिक | तांत्रिक | अतांत्रिक |
| १. | सा.प्र.विभाग | २४ | ११६२ | ० | ३४७ | ० | २५८ | ० | ८९ |
| २. | ए. बा. वि. से.यो.विभाग | ५० | ० | ५० | ० | ५० | ० | ० | ० |
| ३. | वित्त विभाग | ० | ४९ | ० | १५ | ० | १३ | ० | २ |
| ४. | शिक्षण विभाग | ९०५४ | ० | २७१३ | ० | २६८६ | ० | २७ | ० |
| ५. | कृषी विभाग | १६ | ० | ५ | ० | १ | ० | ४ | ० |
| ६. | पशुसंवर्धन विभाग | ६६ | ० | २० | ० | ६ | ० | १४ | ० |
| ७. | आरोग्य विभाग | ५५६ | ० | ३५९ | ० | ३५२ | ० | ७ | ० |
| ८. | बांधकाम विभाग | १६२ | ० | ४६ | ० | ४ | ० | ४३ | ० |
| ९. | पंचायत विभाग | ५५५ | ० | १६५ | ० | १२१ | ० | ४४ | ० |
| | **एकूण** | १०४८३ | १२११ | ३३५८ | ३६२ | ३२२० | २७१ | १३९ | ९१ |



भरतीसाठी उपलब्ध रिक्त पदानुसार समांतर आरक्षणांची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याने महिला आरक्षणाची पदे रिक्त आहेत पुढील भरती करतांना महिला आरक्षणाची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हा परिषदेच्या अखत्यारित एकूण ५० प्राथमिक आरोग्य केंद्र असून ९२ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. त्यापैकी ३२ महिला वैद्यकिय अधिकारी असून त्याची नेमणूक संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांचेमार्फत केली जाते.

आरोग्य सेवक पुरुष १३५ पदे, आरोग्य सहायक पुरूष ६५ पदे, आरोग्य पर्यवेक्षक पुरूष ८ पदे व कुष्ठरोग तंत्रज्ञ पुरूष ८ पदे कार्यरत आहेत. आरोग्य सेवक महिला ३४१ पदे व आरोग्य सहायक महिला ४८ पदे कार्यरत असून ही पदे १००टक्के महिला संवर्गातून भरली जातात.

औषध निर्माण अधिकारी ५६ पदे मंजूर असून ५३ पदे भरलेली आहेत. सदर पदांमध्ये ३० टक्के महिला आरक्षणानुसार १८ पदे भरावयाची असून ११ पदे भरलेली आहेत. सदर संवर्गात ७ महिलांचा अनुशेष बााकी आहे. अशी माहिती प्राप्त झाली.

**औरंगाबाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिनांक १० जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जाहिरातीनुसार महिला उमेदवारांकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे जी पदे रिक्त राहिली आहेत. अशा रिक्त पदांसाठी पुन्हा जाहिरात दिली होती का ? स्थापत्य अभियंता सहायक या पदावर उमेदवार उपलब्ध झाले आहेत का ? सदर पदे किती वर्षांपासून रिक्त आहेत ? अशी विचारणा केली.

कार्यकारी अभियंता यांनी स्थापत्य अभियंता सहायक या पदावर उमेदवार उपलब्ध झाले नव्हते. परंतु, प्रत्येक वेळी जाहिरातीमध्ये सदरची पदे महिलांसाठी आरक्षित असल्याची बाब नमूद करण्यात आली होती. दिनांक १०/९/२०११ पासून सदर पदे रिक्त आहेत. दोन महिन्यांनी जाहिरात दिलेली नाही. परंतु, पुन्हा पुढील वर्षी पदे भरण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्यावेळी जाहिरात दिली जाते, त्यावेळी सेवायोजन केंद्राला देखील कळविण्यात येते. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामविकास विभागाने पद भरतीबाबतचे वार्षिक वेळापत्रक तयार केले आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेमार्फत जाहिरात दिली जात असते. तथापि, आता समितीने केलेल्या सूचनेनुसार आम्ही ग्रामविकास विभागाला संदर्भ करतो व महिलांसाठी आरक्षित असलेली पदे भरण्यासाठी विशेष बाब म्हणून सातत्याने प्रयत्न करण्यासाठी वेळापत्रकाशिवाय अन्य वेळीही जाहिरात देण्याबाबतची अनुमती मागतो. असा समितीस खुलासा केला.

समितीने शिक्षण विभागामध्ये तांत्रिक पदे कोणती आहेत ? जिल्हा परिषदेकडे प्राथमिक व माध्यमिक महिला शिक्षकांची संख्या किती आहे ? शिक्षकांची पदे भरतांना महिलांसाठी ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात येतात काय ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? बढती देतांना महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात येते काय ? रिक्त पदांची सद्यःस्थिती काय ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी डी.एड., ज्यांना आता डी.टी.इ.एड.असे संबाोधतो, अशा विशेष अर्हता धारण केलेल्या शिक्षकांची पदे तांत्रिक पदांमध्ये दर्शविली आहेत. शिक्षकांची पदे प्रशासकीय स्वरुपाची समजली जातात. तसेच शिक्षणाधिकारी यांनी सन १९६७ चे सेवा भरती नियम आहेत. त्यामध्ये शिक्षक हे पद तांत्रिक पदामध्ये दर्शविण्यात आले आहे. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक शिक्षक सरळसेवेची रिक्त पदे ९० असून माध्यमिक शिक्षक सरळसेवेची ८ पदे रिक्त आहेत, शारीरिक शिक्षक सरळसेवेची ८ पदे रिक्त असून चित्रकला शिक्षकांची सरळसेवेची २४ पदे रिक्त आहेत. सदर पदे गत माहे मार्च पासून रिक्त झालेली आहेत. औरंगाबाद जिल्हयात बाहेरच्या जिल्हयातून येणाऱ्या शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. पती-पत्नी एकत्रिकरणाला प्राधान्य दिले जाते. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेमध्ये महिला शिक्षकांचे प्रमाण जास्त असून या जिल्हयात महिलांचा अनुशेष शिल्लक नाही. असे समितीस सांगितले.

समितीने आरोग्य विभागात महिलांसाठी एकूण किती पदे आरक्षित होती व किती भरण्यात आली आहेत ? प्रकल्प अधिकाऱ्यांच्या जागा भरल्या आहेत का ? सदर ७ रिक्त पदे कधीपर्यंत भरली जातील ? अशी विचारणा केली.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आरोग्य सेवक संवर्गात महिलांसाठी २२ पदे आरक्षित असून सदर पदे भरलेली आहेत. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जेव्हा पासून महिलांसाठी ३० टक्के आरक्षण लागू करण्यात आले तेव्हा पासून जिल्हा परिषदेकडून महिलांची ३० टक्के पदे आवर्जुन भरण्यात येतात. समांतर आरक्षणाची पदे भरण्याची कार्यवाही सुरू असल्यामुळे सदर पदे रिक्त आहेत. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सद्य:स्थितीत ज्येष्ठ अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार दिला असून ही पदे तातडीने भरावीत, अशा प्रकारची विनंती शासनाला करण्यात आली आहे. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेने जाहिरात देवूनही स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावर महिला उपलब्ध झाल्या नसल्याची माहिती दिलेली आहे. आता काय स्थिती आहे ? तसेच ग्रामविकास विभागाला विशेष बाब म्हणून पद भरतीसाठी अनुमती मागितलेली आहे का? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी सन २०११-१२ मध्ये जी ५ पदे राखीव ठेवण्यात आली होती. त्यामध्ये गुणवत्तेनुसार पात्र महिला उपलब्ध न झाल्यामुळे त्यावर्षी ती पदे भरण्यात आली नव्हती. सन २०१२-१३ मध्ये ६ पदे राखीव ठेवण्यात आली होती. परंतु ५ महिला गुणवत्तेनुसार उपलब्ध झाल्यामुळे त्यांना बढती देण्यात आली आहे. सन २०१३-१४ मध्ये चार महिला उमेदवार प्राप्त झालेल्या आहेत आणि सन २०१४-१५ मध्ये तीन पदे राखीव ठेवण्यात आली होती. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणामध्ये विशेष बाब म्हणून अनुमती मागितलेली नव्हती. कारण जाहिरात देऊन जी पद भरती जिल्हा परिषदेकडून करण्यात येते. त्यामध्ये तशी तरतूद नाही. असे समितीस सांगितले.



समितीने शिक्षण विभागामध्ये पद भरती संदर्भात डी.एड. आणि बी.पी.एड. अशी विशेष अर्हताधारक शिक्षकांना तांत्रिक पदामध्ये दर्शविलेले आहे. सदरची पदे प्रशासकीय अथवा शालेय शिक्षण विभागात दर्शविण्यात यावी. सन १९६७ मधील सेवाभरती विषयक नियम काय आहेत? अशी विचारणा केली.

विभागीय सचिवांनी शिक्षक पद हे तांत्रिक पदच आहे हा भाग वेगळा असला तरी डी.एड., बी.पी.एड. या तांत्रिक पदांसाठी ते प्रशिक्षीत झाल्याशिवाय त्यांची नेमणूक करता येत नाही. नियम पुस्तकामध्ये दुरुस्ती करायची आवश्यकता आहे. असे समितीस सांगितले.

समितीने शिक्षक प्रवर्गातील पती-पत्नी एकत्रिकरणाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात मागणी असून शासनाच्या नियमाप्रमाणे बिंदूनियमावली वापरावयाची असल्यास पती-पत्नी एकत्रिकरणाच्या बदलीमध्ये अडचणी येत आहेत. या संदर्भात विभागाचे काय धोरण आहे? नवरा चंद्रपूरला असेल आणि बायको औरंगाबादला असेल तर काय करणार? अशी विचारणा केली.

विभागीय सचिवांनी दिनांक १५ मे, २०१४ नुसार बदल्यांबाबतचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार प्राधान्यक्रमाने पती-पत्नी एकत्रिकरण बदली करण्यात येते. दिनांक २९ सप्टेंबार २००० नुसार कर्मचाऱ्यांच्या आंतर जिल्हा बदलीबाबत धोरण निश्चित केले जाते. दिव्यांग कर्मचारी, परितक्त्या, काही गंभीर आजाराने त्रस्त असतील अशा कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेकडून प्राधान्य दिलेले आहे. अशा कर्मचाऱ्यांसाठी प्राधान्यक्रम ठेवलेला आहे. प्रत्येक जिल्हावार नोंदवही तयार करण्यात आली आहे. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची दिनांक १० जुलै, २०१४ रोजी साक्ष घेतली. उक्त साक्षीत जिल्हा परिषदेत मोठ्या प्रमाणावर महिलांची रिक्त पदे असून ती वेळीच का भरली नाही ? मोठ्या प्रमाणावर अनुशेष का आहे ? तसेच समितीने सदरची पदे कधीपासून रिक्त आहेत अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे सांगितले की, महिलांची पदे भरताना वृत्तपत्रात जाहिरात देऊन त्यात महिलांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबत नमूद केले जाते. जी पदे रिक्त आहेत अशी रिक्त पदे पुन्हा पुढील वर्षी भरण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन, त्याचप्रमाणे सेवायोजन कार्यालयालादेखील कळविण्यात आलेले आहे. ग्रामविकास विभागाने पद भरतीबाबत वार्षिक वेळापत्रक तयार केले असून उक्त वेळापत्रकानुसार पद भरतीची प्रक्रिया जिल्हा परिषदेद्वारे राबाविली जाते व त्यात महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदांचादेखील उल्लेख करण्यात येतो. तांत्रिक पदे महिला उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे भरली जात नाहीत. तसेच प्राथमिक शिक्षकांची सुमारे ९० पदे रिक्त असून ती गत मार्च महिन्यांपासून रिक्त आहेत. औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये महिला शिक्षकांचे प्रमाण जास्त असून या जिल्ह्यात महिला शिक्षकांचा अनुशेष नसल्याची बाब समितीसमोर विशद केली. आरोग्य सेवेतील सुमारे २२ पदे रिक्त आहेत असे निदर्शनास आणून दिले असता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण शासन निर्णयानुसार लागू करणार असून त्यानुसार सदरची आरक्षित पदे आवर्जून भरण्यात येतात, समांतर आरक्षणाची कार्यपद्धती सुरू असल्यामुळे रिक्त पदे आहेत असेही समितीला सांगण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळीदेखील अनेक पदे रिक्त असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर विदित केले. सन २०११-१२ मध्ये गुणवत्तेनुसार पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे ५ पदे राखीव ठेवण्यात आली होती. ती सन २०१२-१३ मध्ये पुढील वर्षात भरण्यात आली आहेत. समितीने शिक्षक प्रवर्गातील पती-पत्नी एकत्रिकरणाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर बदलीची मागणी असते आणि शासनाच्या निर्णयानुसार या बदल्यांमध्ये अडचणी येत आहेत, त्यामुळे पती-पत्नी एकत्रिकरणाकडे शासनाच्या धोरणात बदल करण्यासंदर्भात विभागाचे काय मत आहे अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी दिनांक १५ मे २०१४ नुसार बदल्यांच्या कायद्याद्वारे शासन धोरण निश्चित केले असून त्यात प्राधान्यक्रमाणे पती-पत्नी एकत्रिकरणाद्वारे बदली करण्याची बाबदेखील अंतर्भूत आहे. त्याचप्रमाणे दिनांक २९ सप्टेंबर २००० नुसार कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत शासनाने धोरण निश्चित केले असून त्यावर दिव्यांग कर्मचारी, परितक्त्या, गंभीर स्वरुपाचे आजारी इत्यादी कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेतून प्राधान्य दिले जाते व सदरचा प्राधान्यक्रम जिल्हावार, रोस्टरद्वारे राबाविला जातो.

समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये महिलांसाठी शासन निर्णयानुसार आरक्षित असलेली ३० टक्के पदे वेळीच भरली जात नाहीत असे निदर्शनास आले आहे. यात तांत्रिक पदांची व पात्र महिला उमेदवार मिळत नसल्याची बाबदेखील समितीला सांगण्यात आली. त्याचप्रमाणे अशी भरती करताना महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास समांतर आरक्षणदेखील वापरले जाते. पात्र उमेदवार न मिळणे या सबबीवर त्यांची भरती केली जात नाही हे अत्यंत गंभीर असून अशा प्रकारच्या सबबी सांगून वर्षानुवर्षे महिला उमेदवारांची पदे रिक्त दाखवून सदरची पदे समांतर आरक्षण वापरुन भरली जातात यामुळे महिलांसाठी शासन निर्णयानुसार आरक्षित ठेवण्यात आलेली ३० टक्के पदे भरली न जाता ती मोठ्या प्रमाणावर रिक्त राहतात व त्याचा अनुशेष न ठेवता ती समांतर आरक्षणाच्या माध्यमातून पुरुष उमेदवारांद्वारे भरली जातात. त्यामुळे शासनाच्या या धोरणाबाबत महिलांसाठी न्याय मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. **महिलांकरिता शासनाने ३० टक्के जागेचे जे धोरण निश्चित केले आहे त्याची पूर्तता करावयाची झाल्यास समांतर आरक्षणाबाबत शासनाने पुनर्विचार करावा. कारण सद्यःस्थितीत महिला ह्या प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत त्यांना प्रत्येक क्षेत्रात वाव मिळणे आवश्यक आहे त्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे हेही तेवढेच गरजेचे आहे. सक्षम महिला उमेदवार मिळत नाही ही केवळ सबब आहे असे समितीचे मत आहे. महिलांना देय असलेले आरक्षण नाकारुन त्याऐवजी पुरुष भरती करून समांतर आरक्षण राबाविणे सुकर व्हावे अशीच वेगवेगळ्या प्रशासकीय विभागाची मानसिकता असल्याचे समितीला दिसून येते. सबब, महिलांना खऱ्या अर्थाने न्याय देण्याकरिता महिलांकरिता ३० टक्के राखीव जागा राबाविण्याचे धोरण शासनाने काटेकोरपणे अंमलात आणण्यासाठी समांतर आरक्षणाबाबतचा शासन निर्णयाचा पुनर्विचार करून सदरचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करून शासन धोरणानुसार शासकीय/ निमशासकीय सेवेत ३० टक्के महिलांसाठी आरक्षीत जागा कोणत्याही परिस्थितीत भरण्यात याव्यात अशा कडक निर्बंधांचा शासन निर्णय निर्गमित करून तो राज्य शासनाच्या सर्व शासकीय/ निमशासकीय प्रशासकीय यंत्रनांना लागू करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणी केलेली कार्यवाही समितीला तीन महिन्यांत कळविण्यात यावी.**





**१.२ औरंगाबाद, जिल्हापरिषदेचे अंदाजपत्रक व महिलांसाठी कल्याणकारी योजना :-**

औरंगाबाद, जिल्हापरिषदेचे गत तीन वर्षातील अंदाजपत्रक किती रकमेचे आहे ? महिला अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी जिल्हा परिषदेकडून स्वतंत्र कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जातात का ? आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्यासाठी राबाविण्यात येणाऱ्या सोयी सवलती इत्यादी योजनाबाबतची माहिती देण्यात यावी. शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद निधीतून महिलांसंबंधित कार्यक्रमासाठी १० टक्के रक्कम खर्च करण्यात येते का? असल्यास गत ३ वर्षात किती रक्कम खर्च करण्यात आली? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी औरंगाबाद, जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

औरंगाबाद, जिल्हापरिषदेची गत तीन वर्षातील अंदाजपत्रकीय तरतूद :-

| अनु. क्र. | वर्ष | | अंदाजपत्रकीय तरतूद |
|---|---|---|---|
| (१) | २००९-१० | | १२,७१,५६,००० |
| (२) | २०१०-११ | | ११,२२,७९,६०० |
| (३) | २०११-१२ | | १४,७२,५१,००० |
| | | एकूण | ३८,६६,८६,६०० |

सदर अंदाजपत्रकातील रकमेपैकी जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी खालील रक्कम राखून ठेवण्यात आली आहे.

| अनु. क्र. | वर्ष | | अंदाजपत्रकातील रकमेपैकी कल्याणकारी योजनेसाठी राखून ठेवलेली रक्कम |
|---|---|---|---|
| (१) | २००९-१० | | १,०५,८०,००० |
| (२) | २०१०-११ | | ८६,३०,३०० |
| (३) | २०११-१२ | | १,२९,६०,००० |
| | | एकूण | ३,२१,७०,३०० |

महिला अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी जिल्हा परिषदेकडून स्वतंत्र कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जात नाहीत.

**जिल्हा परिषद उपकरातील योजना**

| अ.क्र | योजना |
|---|---|
| १. | इ. ५ वी ते १० वी मुलींना सायकल वाटप योजना |
| २. | महिला समुपदेशन केंद्र |
| ३. | महिला प्रतिनिधी अभ्यास केंद्र |
| ४. | महिला तक्रार निवारण समिती |
| ५. | ९० टक्के अनुदानावर महिला व मुलींना व्यावसायीक व तांत्रिक प्रशिक्षण |
| ६. | १० वी व १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण. |
| ७. | ९० टक्के अनुदानावर दिव्यांग महिलांना पिठाची गिरणी पुरविणे. |

सन २०१२-२०१३ मध्ये ३३९ महिला लाभार्थ्यांना सायकलीचे वाटप करण्यात आले असून सन २०१२-२०१३ मध्ये ११३३ महिलांना व्यावसायीक तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये सायकलीसाठी २२ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून लाभार्थ्यांच्या यादीस मान्यता देण्यात आली आहे. सन २०११-२०१२ या वर्षामध्ये सायकलीसाठी २० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात सदर योजनेसाठी २५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

**शासकीय हस्तांतरित योजना**

| **अ.क्र** | **योजना** |
|---|---|
| १. | विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहासाठी विवाह भत्ता |
| २. | व्यावसायीक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन (वि.घ.यो) |
| ३. | व्यावसायीक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन (स.सा) |
| ४. | स्वयंरोजगार योजना (विघयो) |
| ५. | महिला व बाल कल्याण समिती (विघयो) सायकल वाटप योजना |

महिलांच्या कल्याणाकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनेकरिता शासनाकडून विघयो सन २००९-१०, २०१०-११ व सन २०११-१२ पर्यंत खालीलप्रमाणे रक्कम प्राप्त झाली. त्याचा विनियोग खालील दर्शविलेल्या योजनेवर करण्यात आला आहे.

| **अ.क्र.** | **योजना** | **प्राप्त तरतूद** | | |
|---|---|---|---|---|
| | | **२००९-१०** | **२०१०-११** | **२०११-१२** |
| १. | विवाह भत्ता | १०००० | ६००० | १०००० |
| २. | विद्या वेतन (विघयो) | १०००० | — | १२८००० |
| ३. | स्वयंरोजगार योजना (विघयो) | १७०००० | ५९००० | ३०००० |
| ४. | म.बा.क.समिती सायकल वाटप योजना (विघयो) | ५३३००० | ४८०००० | ४५३००० |



जिल्हापरिषदेअंतर्गत महिलांच्या आरोग्याबाबत खालीलप्रमाणे योजना राबविल्या जातात.

**जननी सुरक्षा योजना :-** ग्रामीण भागातील SC,ST,BPL धारक गरोदर मातांना रू. ७०० व शहरी भागातील मातांना रू.६०० व घरी प्रसुती झाल्यास रु. ५०० चा लाभ दोन अपत्यापर्यंत देण्यात येतो.

**जननी शिशु सुरक्षा योजना :-** यामध्ये गरोदर मातांना प्रसुतीसाठी घर ते संस्था व संस्था ते घर अशी मोफत सेवा दिली जाते. प्रसुतीसाठी दाखल मातांना संस्थेत मोफत आहार दिला जातो. मोफत औषधे व मोफत तपासणी केली जाते.

**कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया :-** कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. तसेच रू. ६५० चा लाभ दिला जातो.

**सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना :-** BPL धारक महिलेने एका मुलीनंतर शास्त्रक्रिया केल्यास रु. ८००० चे पोस्टाचे प्रमाणपत्र व नगदी स्वरुपात रू. २००० देण्यात येतात.

**शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद निधीतून महिला कार्यक्रमासाठी १० टक्के रक्कम खर्च करण्याबाबत**

| अ.क्र | योजनेचे नाव | सन २००९-२०१० | | सन २०१०-२०११ | | सन २०११-२०१२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | सायकल योजना | २५.०० | २४.७४ | ३९.५० | ३९.४८ | २०.०० | ०.२८ |
| (२) | अंगणवाडी कार्यकर्ती पुरस्कार | ,, | ,, | १.०० | ,, | १.०० | १.०० |
| (३) | अंगणवाडी साहित्य पुरविणे | ,, | ,, | ,, | ,, | १५.०० | १४.९९ |
| (४) | महिलांसाठी समुपदेशन केंद्र | २.०० | ०.९० | २.०० | १.९८ | ५.४० | ४.७० |
| (५) | अंगणवाडीतील बालकांना अतिरिक्त आहार | ,, | ,, | ,, | ,, | १५.०० | १४.९९ |
| (६) | महिला प्रतिनिधी अभ्यास सहल | ०.२० | ०.२० | ०.४५ | ०.४५ | ०.४५ | ०.४५ |
| (७) | १० वी व १२वी मुलींना संगणक प्रशिक्षण | ,, | ,, | ,, | ,, | ३०.०० | २९.२९ |
| (८) | महिला व मुलींना व्यावसायीक तांत्रिक प्रशिक्षण | ,, | ,, | ,, | ,, | ११.२५ | ११.२३ |
| (९) | योजना सादिल | ,, | ,, | ०.२५ | ०.०५ | ०.२५ | ०.२५ |
| (१०) | महिला तक्रार निवारण समिती | ०.१० | ०.०१ | ०.१० | ०.०२ | ,, | ,, |
| (११) | दिव्यांग महिला व मुलींना तीन चाकी सायकल ऐवजी पिठाची गिरणी | ,, | ,, | ,, | ,, | ३.०० | २.९४ |

**औरंगाबाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिनांक १० जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेचे गत ३ वर्षात वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रकमेचे होते? अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यात आली ? अशी विचारणा केली.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सन २०११-२०१२ या वर्षाचे अंदाजपत्रक रुपये १४.७२ कोटीचे होते. ग्रामविकास विभागाच्या दिनांक १२ ऑगस्ट, १९९४ च्या शासन निर्णयानुसार महिलांच्या योजनांसाठी ५ टक्के रकमेची तरतूद करणे अनिवार्य आहे. त्यानुसार रुपये १४.७२ कोटीची रुपयांची तरतूद शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नामधून मुद्रांक शुल्क व अन्य बाबी वगळता राहिलेल्या उत्पन्नाच्या ५टक्के एवढी तरतूद करण्यात आली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये रुपये १६.०९ एवढी तरतूद करण्यात आली असून सन २०१३-२०१४ मध्ये १८.९१ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने जिल्हा परिषदेमार्फत महिलांचे बलशालीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच महिलांकरिता देण्यात येणाऱ्या सोयी सवलती इत्यादी योजनांची माहिती देण्यात यावी अशी सूचना केली.

त्यावर बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी सन २०१२-२०१३ या वर्षात ३३९ महिला लाभार्थ्यांना सायकलीचे वाटप करण्यात आले असून सन २०१२-२०१३ मध्ये ११३३ महिलांना व्यावसायीक तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये सायकलीसाठी २२ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून लाभार्थ्यांच्या यादीस मान्यता देण्यात आली आहे. सन २०११-२०१२ या वर्षामध्ये सायकलीसाठी २० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात सदर योजनेसाठी २५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. असे समितीस सांगितले.

समितीने सायकल योजनेसाठी सन २०११-२०१२ मध्ये २० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु, एकाही लाभार्थ्याला लाभ देण्यात आलेला नाही. सन २०१२-२०१३ मध्ये ३३९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. सन २०११-२०१२ मध्ये खर्च का करण्यात आला नाही ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०११-२०१२ मध्ये २० लक्ष रुपयांची तरतूद केली होती. परंतु, ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार सदर योजना वगळण्यात आली त्यामुळे त्यावर्षी खर्च करण्यात आला नाही. त्यानंतर दिनांक २२ जुलै, २०११ रोजी शासनाने पुन्हा शुद्धिपत्रक काढून ही योजना समाविष्ट केल्यामुळे सन २०१२-२०१३ मध्ये ३३९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. दिनांक १० जुलै, २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे ही योजना वगळण्यात आली होती व पुन्हा दिनांक २२ जुलै, २०११ च्या शुद्धी-पत्रकानुसार या योजनेचा समावेश झाला. संबंधित पुरवठादाराने दिनांक ३१ मार्च पर्यंत पुरवठा न केल्यामुळे दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजीच्या आदेशाप्रमाणे पुरवठा आदेश रद्द करण्यात आले व त्यामुळे खर्च झालेला नाही. आता निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे असे समितीस सांगितले.



समितीने योजना वगळण्यात आली व पुरवठा आदेश रद्द करण्यात आले, अशी दोन कारणे दिलेली आहेत. नेमके कोणते कारण आहे ? अशी विचारणा केली.

प्रशासन अधिकारी यांनी सन २०११-२०१२ या वर्षात २० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सायकल खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली. निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना शासनाचा दरकरार प्राप्त झाला. त्यावेळी निविदा अंतिम झाली नव्हती असे समितीस सांगितले.

समितीने सदरची खरेदी नियमानुसार झाली आहे का ? किती पैसे खर्च करण्यात आले ? याबाबतची संपूर्ण चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व अहवाल समितीला सादर करावा. अशी सूचना केली.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सन १९९५ च्या शासन निर्णयानुसार दर करार उपलब्ध असेल तर निविदा मागवून खरेदी करता येत नाही. दर करार नसल्यामुळे निविदेची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर दर करार प्राप्त झाला तर निविदा प्रक्रिया थांबवून दर करारानुसार खरेदी करावी लागते. रुपये ५० हजार पर्यंतची खरेदी दर पत्रके मागवून करता येते. रुपये ५० हजारांच्यावर कितीही रक्कम असेल तर निविदा मागवून खरेदी करावी लागते किंवा दर करारानुसार खरेदी करावी लागते असे समितीस सांगितले.

समितीने निविदा प्रक्रिया कधी सुरू करण्यात आली, निविदा प्रक्रिया अंतिम करण्याची तारीख किती होती, दर करार कधी प्राप्त झाला, निविदा प्रक्रिया कधी रद्द करण्यात आली व दर करारानुसार कधी खरेदी आदेश देण्यात आली. निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याचा कालावधी किती होता ? याची माहिती समितीला सादर करावी.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०११ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली व दिनांक २ जानेवारी, २०१२ रोजी दर करार प्राप्त झाला. दिनांक ४ जानेवारी, २०१२ पर्यंत निविदा प्रक्रियेवरील कार्यवाही पूर्ण करावयाची होती. पुरवठा आदेश रद्द करण्यात आलेले आहेत. सन २०११-२०१२ मध्ये पुरवठा झालेला नाही. पुरवठ्याची मुदत संपल्यामुळे आदेश रद्द करण्यात आले. त्यानंतर सन २०१२-२०१३ मध्ये ३३९ लाभार्थ्यांना सायकलीचे वाटप केले आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांमार्फत या प्रकरणाची संपूर्ण चौकशीकरून अहवाल समितीला सादर केला जाईल. सन २०११-२०१२ या वर्षात रुपये १४.९९ लक्ष व सन २०१२-२०१३ या वर्षात रुपये १९.९९ लक्ष खर्च करण्यात आले होते. परंतु सन २०१३-२०१४ या वर्षात महिलांच्या सक्षमीकरण योजनांवर तरतूद करण्यात आली नव्हती असे समितीस सांगितले.

समितीने सन २०११-२०१२ या वर्षात महिलांचे सक्षमीकरणासाठी कोण कोणते साहित्य खरेदी करण्यात आले होते ? अशी विचारणा केली.

अधिकाऱ्यांनी सन २०११-२०१२ या वर्षात महिलांच्या सक्षमीकरणासाठी वजन काटे, औषधे खरेदी करण्यात आली होती, तसेच हाईट मेजरींग स्केल, कॅल्सी सस्पेंशन औषध खरेदी करण्यात आली होती. असे समितीस सांगितले.

समितीने साहित्य आणि औषधे यामध्ये फरक आहे. औषधे हे साहित्यामध्ये येत नाहीत. अशी सूचना केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अंगणवाडयांसाठी औषधे उपलब्ध दिली जात असतात. बऱ्याच अंगणवाडयांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळालेले आहे. लोक सहभागातून अंगणवाडयांचे बरेच चांगले काम झालेले आहे. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अंगणवाडयांसाठी जे काही साहित्य खरेदी करण्यात आले ते आरसी प्रमाणे खरेदी करण्यात आले होते. अंगणवाडयांसाठी मुबलक प्रमाणात साहित्य खरेदी करण्यात आल्यामुळे सन २०१३-२०१४ मध्ये तरतूद करण्याची आवश्यकता राहिली नाही. असे समितीस सांगितले.

समितीने संगणक प्रशिक्षणाची माहिती द्यावी. तसेच व्यावसायिक प्रशिक्षणाबाबतची माहिती द्यावी. अशी सूचना केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०११-२०१२ मध्ये ३० लक्ष रुपयांची तरतूद संगणक प्रशिक्षणासाठी करण्यात आली होती. जवळ जवळ पूर्ण रक्कम खर्च झाली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये २८ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यावर्षी प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. तथापि, ही रक्कम सन २०१३-१४ मध्ये खर्च झाल्याचे दाखविण्यात आले आहे. सन २०१३-१४ मध्ये देखील ४८ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे व त्यावर्षी देखील प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. मात्र, त्यावर्षी सन २०१२-२०१३ मधील खर्च झालेली रक्कम दर्शविण्यात आली आहे. सन २०१३-२०१४ मध्ये झालेल्या प्रशिक्षणाचा खर्च अद्याप अदा करावयाचा आहे. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या योजनेसाठी सन २०११-२०१२ मध्ये रुपये ११,२५,००० एवढी तरतूद करण्यात आली होती व तेवढी तरतूद खर्च करण्यात आली आहे. व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले आहे. सन २०१२-२०१३ मध्ये २० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार त्यावर्षी प्रशिक्षण झालेले आहे. तथापि, त्यावर्षी पेमेंट न झाल्यामुळे खर्च दाखविण्यात आलेला नाही. ही रक्कम सन २०१३-२०१४ मध्ये अदा करण्यात आली आहे. सन २०१३-१४ मध्ये ३७ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. तथापि, ही रक्कम त्यावर्षी अदा करण्यात आलेली नाही. पेमेंट अद्याप बाकी आहे असे समितीस सांगितले.

समितीने सन २०११-१२ या वर्षात किती लाभार्थ्यांना पिठाच्या गिरणीचे वाटप करण्यात आले व त्यासाठी एकंदर किती रुपये खर्च आला ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०११-१२ या वर्षात १९ लाभार्थ्यांना पिठाच्या गिरणीचे वाटप करण्यात आले असून एकंदरीत रुपये २,९३,८४३ इतका खर्च आला असून एका पिठाच्या गिरणीची किंमत रुपये १६ हजार आहे असे समितीस सांगितले.

समितीने विधवा महिलांच्या मुलींसाठी विवाह भत्ता किती दिला जातो ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी रुपये २ हजार विवाह भत्ता दिला जात होता. परंतु सन २०१४-१५ पासून विधवा मुलींच्या लग्नासाठी रुपये १० हजार विवाह भत्ता दिला जातो असे समितीस सांगितले.



समितीने महिला उद्योजकांसाठी विशेषतः आर्थिकदृष्टया मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरिता जिल्हा परिषदेमार्फत विशेष सोयी सवलती देण्यात येतात काय? असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी अशी सूचना केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिला उद्योजकासाठी विशेषतः उद्योगधंद्याकरिता या विभागामार्फत विशेष सोयी सवलती देण्यात येत नाहीत परंतु शासकीय अनुदानातून स्वयंरोजगार योजनांतर्गत रु. ५०० वैयक्तीक अनुदान देण्यात येते. वैयक्तीक अनुदान वाढविण्याची आवश्यकता आहे. सदर योजना उपकरातून राबवणे शक्य आहे असे समितीस सांगितले.

समितीने जिल्हा परिषदेमार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सवलीत इ. बाबतची माहिती देण्यात यावी. या योजनेची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी योजना जिल्हा परिषदांकडे आहे काय ? असल्यास त्याचे स्वरूप काय आहे व या यंत्रणेने आतापर्यंत कशा प्रकारे कार्य केले आहे ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेमार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सवलती बाबत जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी गट विकास अधिकारी व त्यांचे अधिनिस्त असलेले कर्मचारी (बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक) याचेमार्फत योजनेची माहिती लाभार्थ्यांना देण्यात येऊन त्यांना प्रोत्साहन देण्यात येते असे समितीस सांगितले.

समितीने महिला अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी जिल्हा परिषदेकडे कोणकोणत्या कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जातात तसेच जिल्हा परिषदेमार्फत विधवा/परित्यक्ता आणि निराधार महिलांसाठी कोणत्या योजना सुरू केल्या आहेत ? १० टक्के राखीव निधीतून काही योजना सुरू केली आहे का ? महिलांसाठी काही योजना सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव तुम्ही पाठविले आहेत का व त्यासाठी निधीची मागणी केली आहे का ? अशी विचारणा केली. तसेच जिल्हा परिषदेच्या बजेटच्या १०टक्के खर्च यामध्ये करता येऊ शकतो. अशी सूचना केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षात तक्रार निवारण समितीची दि. ६.६.२०१२ रोजी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदरील कार्यशाळेच्या माध्यमातून महिलांवर होणारे लैंगिक अत्याचार विषयक बाबीवर जाणीव जागृती निर्माण होण्याच्या दृष्टीने तसेच प्रचलित शासन निर्णय व नियम याबाबतची माहिती देण्यात आली. या महिलांना २ हजार रुपये अनुदान देण्यात येते. दिनांक १० मार्च, २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे अशी मागणी करता येत नाही. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी यासंदर्भात ग्रामविकास विभागाचा दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजीचा शासन निर्णय सुद्धा उपलब्ध आहे असे समितीस सांगितले.

समितीने महिलांसाठी समुपदेशन केंद्रांसाठी सन २०११-२०१२ या वर्षात रुपये ५,४०,००० इतकी तरतूद करण्यात आली परंतु प्रत्यक्षात रुपये ४,७०,६५८ खर्च करण्यात आले. सन २०१३-२०१४ या वर्षात रुपये ४,५०,००० इतकी तरतूद करण्यात आली परंतु प्रत्यक्षात रुपये ३,५७,३८० खर्च करण्यात आले, सन २०१२-२०१३ या वर्षात महिलांसाठीच्या समुपदेशन केंद्रासाठी एक रुपया सुद्धा खर्च न करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर अधिकाऱ्यांनी पंचायत समितीची कामे गट विकास अधिकाऱ्यामार्फत देण्यात आली होती. ज्या स्वयंसेवी संस्थांनी अर्ज केले होते त्यांची निवड करून त्यांच्यासाठी समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले होते. अन्याय झालेल्या महिला असेल किंवा कुटुंबातील महिलांवर अन्याय झाला असेल तर अशा महिलांना न्याय मिळवून दिला जातो. ९ तालुक्यात ९ समुपदेशन केंद्र व १० वे समुपदेशन केंद्र मुख्यालयात सुरू करण्यात आले होते असे समितीस सांगितले.

समितीने तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत कोणते विविध उपक्रम/योजना राबविण्यात आल्या आहेत. सदरहू उपक्रम योजनांमध्ये किती महिलांनी भाग घेतला आहे ? अशी विचारणा केली.

जिल्हा समन्वय अधिकारी, (माविम) यांनी महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत, तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्यात येतो. तेजस्विनी कार्यक्रमात ५ तालुक्यातील १८४ गावातील एकूण १४८० महिला स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन झाले असून त्या अंतर्गत १६,४१४ महिला संघटीत झालेल्या आहेत. यामध्ये शेळी पालन तसेच ज्यांच्याकडे एक गाय होती त्यांना अजून एक गाय देऊन स्वतंत्र डेअरी सुरू करण्यात आली असून शेती फार्मींग सुद्धा केले जाते. ज्यांना शेळया दिल्या होत्या त्या शेळयांना आता दोन दोन पिल्ले झाली आहेत. लाभार्थ्यांना माल विकण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले नसून चांगला भाव मिळावा यासाठी एकत्र मार्केटींगचाही प्रयत्न सुरू आहे. असे समितीस सांगितले.

समितीने कामधेनू योजनेची माहिती समितीला द्यावी अशी सूचना केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माविममार्फत औरंगाबाद जिल्ह्यामध्ये कामधेनु योजनेअंतर्गत एकूण १२ महिला संस्था/महिला मंडळांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले आहे. या माध्यमातून या संस्थांना कामे मिळाली किंवा नाहीत, याची तपासणी केली जात आहे. ही प्रमाणपत्रे सन २००७-२००८ मध्ये देण्यात आली होती. त्यानंतर कोणत्याही संस्थेने प्रमाणपत्राची मागणी केलेली नाही. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने सन २०११-१२ मध्ये रुपये २० लक्ष सायकल खरेदीसाठी तरतूद करण्यात आली होती, तथापि पुरवठादाराने सायकल पुरवठा वेळेत न केल्याने पुरवठा आदेश रद्द करण्यात आला होता. त्यानंतर सदर योजना रद्द करून पुन्हा योजनेस मान्यता दिली व दर कराराद्वारे निविदा अंतिम करण्यात आली होती. सदर प्रकरणी समितीने चौकशी करण्याचे निदेश दिले होते त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय ? चौकशीमध्ये काय आढळून आले ? चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली ? अशी विचारणा केली.



मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सायकल खरेदीची योजना शासनाचे आदेश दिनांक १० मार्च, २०११ अन्वये रद्द करण्यात आली होती. त्यानंतर शुद्धिपत्रक काढून दिनांक २२ जुलै, २०११ अन्वये सदर योजना पुनर्जिवीत करण्यात आली होती. जिल्हा परिषदेस दिनांक २० ऑक्टोबर, २०११ मध्ये सायकल खरेदी करण्यास मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. दिनांक ४ जानेवारी, २०१२ मध्ये निविदा प्रक्रिया समाप्त झाली परंतु त्याच दिवशी जिल्हा परिषद निवडणूक आचारसंहिता लागू झाली व शासनाने निर्गमित केलेला दरकरार देखील प्राप्त झाला. जिल्हा परिषद निवडणूक आचारसंहिता दिनांक १५ फेब्रुवारी, २०१२ रोजी संपुष्टात आली. शासनाकडून दर करार उपलब्ध झाल्यामुळे दर करारानुसार सायकल खरेदीचा ठराव दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ रोजी मंजूर करण्यात आला व पुरवठा आदेश दिनांक २१ मार्च, २०१२ रोजी निर्गमित करण्यात आले असे समितीस सांगितले.

समितीने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१५ रोजी आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी सायकल खरेदीची निविदा प्रक्रिया रद्द करण्याची प्रक्रिया का राबविण्यात आली होती ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाकडून दरकरार प्राप्त झाल्यामुळे त्यानुसार सायकल खरेदी करण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात येणार होती असे समितीस सांगितले.

समितीने गरीब मुलींना घरापासून खूप दूरपर्यंत चालत शाळेत जावे लागते म्हणून सायकल वाटप करण्याची योजना शासनाने सुरू केली. तांत्रिक अडचणी दूर करून गरीब मुलींना योजनेचा वेळेत लाभ देण्यात येत नसल्याने शासनाचे उद्दीष्ट साध्य होत नाही अशी सूचना केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सायकल खरेदीचा निधी हा जिल्हा परिषदेच्या उपकरातील असल्यामुळे सदर निधी पुढील वर्षी रोल ओव्हर करून रुपये २७ लाख निधीची तरतूद सायकल खरेदीसाठी करण्यात आली होती व निविदा प्रक्रियेद्वारे सायकल खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली. जिल्हा परिषद उप करातून ३३९ व शासन अनुदानातून ४९३ सायकल खरेदी करण्यात आल्या व त्यांचे वाटप करण्यात आले आहे असे समितीस सांगितले.

समितीने जिल्हा परिषदेने दिलेल्या माहिती मध्ये “ वरील घटनाक्रम विचार घेता असे दिसून येते की, सदर सायकल योजना राबविण्यासाठी झालेला विलंब हा प्रशासकीय प्रक्रियेमुळे झालेला दिसून येतो.” पुरवठादाराला ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले आहे काय ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर कालावधीमध्ये निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे सायकल खरेदीबाबत वर्कऑर्डर देता आली नव्हती. पुरवठादाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने योजना क्रमांक १ ते १३ बाबतची माहिती समितीस देण्यात यावी अशी सूचना केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०११-१२ मध्ये १३ योजना राबविल्या होत्या, त्यांची माहिती देत आहे. पहिली योजना आदर्श अंगणवाडी कार्यकर्ती पुरस्कार असून ४२ अंगणवाडी कार्यकर्तीना पुरस्कार प्रदान करण्यात आला. दुसरी योजना अंगणवाडीतील कुपोषित बालकांसाठी ग्रोथ मॉनिटरिंग मशिन खरेदी करणे असून, ३३० अंगणवाडी केंद्रांना मशिन्स पुरविण्यात आल्या. तिसरी योजना अंगणवाडीतील तीव्र कमी वजनाच्या बालकांसाठी अतिरिक्त आहार खरेदी व औषध खरेदी असून, ७,४९७ बालकांना लाभ देण्यात आला. चौथी योजना अंगणवाडीतील तीव्र कमी वजनाच्या बालकांसाठी अतिरिक्त आहार खरेदी व औषध खरेदी असून, ६,३३१ बालकांना लाभ देण्यात आला. पाचवी योजना महिला समुपदेशन केंद्राची असून, १० महिला समुपदेशन केंद्रांना लाभ देण्यात आला. सहावी योजना महिला प्रतिनिधी अभ्यास सहल दौरा असून, ८ सन्माननीय जिल्हा परिषद सदस्य, महिला सदस्य व १ कक्ष अधिकारी तसेच काही कर्मचारी यांना लाभ देण्यात आला. सातवी योजना दहावी, बारावी इयत्तेच्या उत्तीर्ण मुलींना डेटा ऑपरेटिंगचे प्रशिक्षण देणे असून, ११९५ मुलींना लाभ देण्यात आला. आठवी योजना फॉर्म छपाईसाठी झालेल्या खर्चाची आहे. नववी योजना दिव्यांग महिलांना ९०टक्के अनुदानावर पिठाची गिरणी पुरविणे असून, १९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. सायकल योजनाही आहे, त्या वर्षीच्या सायकल योजनेवर सविस्तर चर्चा झाली. शासकीय हस्तांतरित योजना ३ होत्या, त्यामध्ये पहिली योजना विधवा महिलेच्या मुलीसाठी विवाह भत्ता असून, ५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. दुसरी योजना विविध व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन विशेष घटक योजना असून, सदर योजना सन २०१२-१३ या वर्षात राबविण्यात आली. तिसरी योजना स्वयंरोजगार योजना आहे. अशी माहिती समितीस दिली.

समितीने जिल्हा परिषद, औरंगाबाद येथे विधवा महिलेच्या मुलीच्या विवाहास विवाह भत्ता या योजनेमध्ये फक्त ५ लाभार्थीच आहेत का ? या योजनेसाठी कोणते निकष लावले ? फक्त रुपये १० हजारच तरतूद का प्राप्त होती ? महिला व बालविकास विभागासाठी १०टक्के तरतुदीमधून जिल्हा परिषद या योजनेसाठी तरतूद करू शकत होती. अशी सूचना केली.

विभागीय सचिवांनी जिल्हापरिषदेला त्या योजनेसाठी फक्त १० हजार रुपयांची तरतूद प्राप्त झाली, त्यामुळे प्रती लाभार्थी फक्त रुपये २ हजार तरतूद झाली. योजनेसाठी १० हजार रुपयांची तरतूद प्राप्त होती, त्यामुळे ५ लाभार्थ्यांनाच लाभ देऊ शकलो. शासन निर्णयामध्ये तसा उल्लेख आहे. अशी माहिती समितीस दिली.

समितीने शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नापैकी १०टक्के निधी महिलांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात येतो. सदरच्या निधीतून कोणत्या योजना राबविण्यात याव्यात याबाबत शासन निर्णयात उल्लेख केलेला आहे. तथापि, काही भागांची भौगोलिक, आर्थिक व सामाजिक स्थिती लक्षात घेऊन त्या-त्या जिल्हा परिषदेमध्ये कोणत्या प्रकारच्या योजना राबविण्यात याव्यात हा अधिकार संबंधित जिल्हा परिषदेला देण्याबाबत शासनाने उक्त शासन निर्णयात काही बदल करण्याची धोरणे आहेत, अशी सूचना केली.



विभागीय सचिवांनी विभागाने याबाबतीत दिनांक २४ जानेवारी, २०१४ ला शासन निर्णय काढलेला आहे, त्याच्या प्रती मी समितीला दिलेल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या सेस फंडाचा १०टक्के निधी कोणत्या उपक्रमांसाठी खर्च करण्यात येतो याचा उल्लेख शासन निर्णयात आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेनुसार त्यांना उपाय दिले तर ते योग्य राहणार नाही. त्यातून काही सूचना आली तर ती विभागामार्फत शासन निर्णयात समाविष्ट करू शकतो. याबाबत यादी तयार केली असून ती यादी उपलब्ध करून देऊ शकतो असे समितीस सांगितले.

समितीने किती उत्पन्नाबद्दलचे निकष ठेवले आहेत ? आतापर्यंत किती खर्च केला आहे ? सर्व खर्च केला आहे का ? जिल्हा परिषदेकडून योजना वाढविण्यात आल्या आहेत, त्यावर खर्च होतो का ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेचा स्व:निधी आहे, त्याच्या १०टक्के निधी महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावा असे आहे. तसेच प्रत्येक जिल्हा परिषद त्यांच्या उत्पन्नातून खर्च करते. जिल्हा परिषदेने फक्त योजनांना मान्यता दिली आहे. मुलींना व्यावसायिक प्रशिक्षणासाठीच्या योजनेवर खर्च करावा वगैरे अशी यादी दिली आहे. उपक्रम अजून वाढवायचे असतील आणि त्यांच्याकडून सूचना आली तर जिल्हा परिषदेकडून उपक्रम वाढवू शकतो. पण त्यांना मूभा देणे योग्य होणार नाही. जिल्हा परिषदेची महिला समिती असून ती खर्च करते असे समितीस सांगितले.

समितीने जिल्हा परिषदेने कोणत्या योजनेवर किती खर्च केला याचे एखादे उदाहरण सांगावे. यावर्षी काय खर्च केला सदर योजनांवर खर्च किती झाला ? गत वर्षी किती खर्च झाला? या संदर्भातील आढावा घेता का ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेने सदर वर्षात सायकल योजना केली आहे, व्यावसायिक प्रशिक्षण दिले आहे आणि एमएससीआयटीचे प्रशिक्षण दिले आहे. गत वर्षी सायकल योजना होती. जिल्हा परिषद सेसमधून ४२ लाख रुपयांच्या सायकल खरेदी केल्या. २० लाख रुपयांच्या शिलाई मशिन खरेदी केल्या. २० लाख रुपयांची पीडीपी योजना होती. एमएससीआयटी योजना २७ लाख रुपयांची होती. याबाबत आढावा घेण्यात येईल. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला भेट देऊन उक्त भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेकडून शासन निर्णयानुसार एकूण महसुली व आस्थापना खर्च वजा जाता जिल्हा परिषदेच्या एकूण अंदाजपत्रकीय उत्पन्नापैकी १०टक्के निधी महिला व बालविकासाच्या योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने तरतूद करून तो खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेची सन २००९-१० या वर्षाची अर्थसंकल्पीय तरतूद रु.१२,७१,५६,००० इतकी होती. या रकमेपैकी महिला व बालविकासाच्या कल्याणकारी योजनांसाठी रु.१,०५,८०,००० इतकी रक्कम राखून ठेवण्यात आली होती, सन २०१०-११ या वर्षांसाठी रु.११,२२,७९,६०० इतक्या वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदीपैकी रु.८६,३०,३०० इतकी रक्कम महिलांच्या विकासाकरिता राखून ठेवण्यात आली

होती तर सन २०११-१२ या वर्षाच्या एकूण वार्षिक अंदाजपत्रकीय रक्कम रु.१४,७२,५१,००० इतक्या तरतुदीपैकी रु.१,२९,६०,००० इतकी रक्कम महिला व बालविकासाच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यात आली होती. उपरोक्त रकमेचे अवलोकन केले असता सदरची रक्कम शासन निर्णयानुसार १०टक्के तरतूद केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे निश्चितच संबंधित अधिकाऱ्यांकडून शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे असे समितीचे ठाम मत आहे. या एकूण तरतुदींपैकी कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या अशी माहिती विचारण्यात आली असता व त्यात खर्च किती केला अशी माहिती विचारली असता यामध्ये सायकल योजना, अंगणवाडी कार्यकर्ती पुरस्कार, अंगणवाडी साहित्य पुरविणे, महिलांसाठी समुपदेशन केंद्रे, अंगणवाडीतील बालकांना अतिरिक्त आहार, महिला प्रतिनिधी अभ्यास सहल, मुलींना संगणक प्रशिक्षण, मुलींना व्यावसायिक तांत्रिक प्रशिक्षण, योजना सादिल, महिला तक्रार निवारण तक्रार समिती, दिव्यांग महिलांना पिठाची गिरणी वाटप इत्यादी योजनांवर खर्च केला असल्याचे समितीला पाठविलेल्या माहितीत नमूद केलेले आहे. तथापि, एकूण तरतुदीपेक्षा अत्यंत अल्प रक्कम उपरोक्त नमूद केलेल्या योजनांवर जिल्हा परिषदेने खर्च केली असल्याचे लेखी स्वरूपात पाठविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यावरून दिसून येते. त्याचप्रमाणे साक्षीच्या वेळीदेखील सदरची १०टक्के रक्कम कोणकोणत्या योजनांवर खर्च केली हे परिपूर्णरीत्या सांगितलेले नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाचे पालन न केल्यामुळे शासनाने ज्या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या एकूण तरतुदीच्या १०टक्के रक्कम (महसुली व आस्थापना खर्च वजा जाता) तरतूद करून खर्च करणे आवश्यक असतानादेखील ती केलेली नाही, असे समितीचे ठाम मत आहे. याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी जिल्हा परिषदेने राबविलेल्या खरेदी प्रक्रियासंदर्भात चौकशी करण्याबाबत दिलेल्या निदेशानुसार समितीला असे सांगण्यात आले की, सायकली खरेदीची योजना शासनाच्या दिनांक १० मार्च, २०११ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आली होती, त्यानंतर शुद्धिपत्रक काढून दिनांक २२ जुलै, २०११ अन्वये सदर योजना पुनर्जीवित करण्यात आली होती. दिनांक २० ऑक्टोबर, २०११ मध्ये सायकली खरेदी करण्यास मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. तथापि, निवडणूक आचार संहितेमध्ये शासनाने निर्गमित केलेला दरकरार प्राप्त झाल्याने उक्त दर करारानुसार सायकल खरेदीचा ठराव दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ रोजी मंजूर करण्यात येऊन सायकलींचे पोटा आदेश दि. २१ मार्च, २०१२ रोजी संकलित करण्यात आले. एकूणच जिल्हा परिषदेने उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार १०टक्के तरतूद निश्चित करून दिनांक ११ डिसेंबर, २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार महिला व बालविकास संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी महिला व बाल कल्याण समितीने सदरची योजना राबविणे आवश्यक असताना त्या नियमानुसार राबविण्यात आल्या नाहीत असे समितीला आढळून आले आहे. कारण एकूण तरतुदीपेक्षा समितीला पाठविलेल्या माहितीत व साक्षीच्या वेळी सांगितलेल्या माहितीत अत्यंत तफावत आढळून येत आहे. याचाच अर्थ संबंधित अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाचे उल्लंघन केले असून त्याद्वारे जिल्हा परिषदेतील महिलांना या योजनेचा लाभ मिळाल्यापासून वंचित ठेवले आहे असे समितीचे मत आहे. कारण प्राप्त अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी १०टक्के रक्कम



(भांडवली खर्च वजा जाता) पूर्णपणे त्या त्या आर्थिक वर्षात शासन निर्णयानुसार खर्च केली असल्याचे कुठेही दिसून येत नाही. त्याचप्रमाणे सदरची रक्कम लगतच्या वर्षी खर्च केली किंवा कसे याचाही उल्लेख लेखी माहितीत अथवा साक्षीच्या वेळी समितीला सांगितलेला नाही. त्यामुळे शासनाने ज्या उदात्त हेतूने महिलांकरिता जिल्हा परिषदेने १०टक्के निधी राखून ठेवण्याची तरतूद करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी संबंधित अधिकाऱ्यांकडून केली जात नाही, ही वास्तविकता आहे. शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करणे हे संबंधित अधिकाऱ्याचे कर्तव्य असते त्यांनी कोणत्याही दबावाखाली काम न करता धोरणाची अंमलबजावणी करणे हा त्यांच्या कर्तव्याचाच भाग आहे. प्रस्तुत प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाप्रमाणे निधीची तरतूद करून त्याप्रमाणे खर्च केला नसल्यामुळे त्यांनी कर्तव्यात कसूर केली आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. शासनाने ज्या उद्देशाने महिलांचे सबलीकरणासाठी उपरोक्त नमूद केलेला शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्याचे उल्लंघन होणे हे समितीला मान्य नाही.

**सबब, औरंगाबाद जिल्हा परिषदेने सन २००९-१०, सन २०१०-११ आणि सन २०११-१२ या वर्षात एकूण अंदाजपत्रकीय तरतुदीमधून (महसुली व आस्थापना खर्च वजा जाता) १०टक्के रक्कम महिला व बाल कल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी तरतूद करणे आवश्यक असताना व तसे अभिप्रेत असताना आवश्यक त्या निधीची तरतूद करून खर्च न केल्यामुळे सदरच्या शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्यामुळे या प्रकरणी उपरोक्त नमूद वरील तीनही वर्षाच्या रकमेबाबत आवश्यक ती तरतूद करण्यात आली नाही. तसेच शासन निर्णयानुसार संबंधित योजनांवर तरतूद प्राप्त रक्कम खर्च का करण्यात आली नाही याबाबतची सर्वंकष चौकशी करून सर्व संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.३ महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याबाबत :-**

जिल्हा परिषदेमार्फत महिलांसाठी तक्रार निवारण समिती व कक्ष स्थापन करण्यात आला आहे काय ? तसेच महिलाकरिता समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले आहे काय ? त्याची कार्यपद्धती काय ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी औरंगाबाद, जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

महिला अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता जिल्हा परिषदेमार्फत तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक १७.७.२००६ अन्वये समितीची स्थापना सन २००७ मध्ये करण्यात आली. सन २०१० ते सन २०१२ पर्यंत एकूण १२ तक्रारी प्राप्त झाल्या असून सहा तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहे. दोन तक्रारीमध्ये चौकशी अहवालानुसार आरोपी अधिकाऱ्यांचा कार्यभार हस्तांतर करण्यात आला आहे. एक तक्रार आरोग्य विभागास परत करण्यात आली आहे. एक चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला आहे. एका तक्रारीवर चौकशी सुरू आहे व एका तक्रारीवर कार्यवाही करण्यात येत आहे.

**औरंगाबाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिनांक १० जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे का व सदर कक्ष कोणत्या अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेत आहे ? सदर समितीचे अन्य सदस्य कोण आहेत ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेने महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विशेष समिती नियुक्त केली आहे. श्रीमती शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी या समितीच्या अध्यक्षा आहेत. सध्या त्या दीर्घ मुदतीच्या रजेवर आहेत. श्रीमती गायकवाड, वरिष्ठ सहायक, श्रीमती पि.के.राठोड, श्रीमती सोनावणे, श्रीमती जोशी, श्रीमती फारुखी या सदस्या आहेत असे समितीस सांगितले.

समितीने समितीकडे एकूण किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत व त्यावर समितीने कोणती कार्यवाही केली आहे ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ६/९/२०१४ पर्यंत एकूण १० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. श्रीमती गिता यांच्या प्रकरणी समितीने केलेली कार्यवाही आणखी दोषपूर्ण आहे. श्रीमती गिता यांची आरोग्य विभागातून बदली झाली असल्याने समितीने तक्रार निकाली काढली आहे, असा निष्कर्ष काढून सदर तक्रार निकाली काढण्यात आली आहे.

समितीने महिला कर्मचाऱ्याची बदली झाली याचा अर्थ त्या कर्मचाऱ्याला न्याय मिळाला, असा होत नाही. महिलेवरील अन्याय व बदली हे दोन स्वतंत्र विषय आहेत. त्यामुळे तक्रारीची पूर्ण चौकशी करणे व दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुद्ध कारवाई करणे अभिप्रेत आहे. परंतु, तशी कोणतीही कार्यवाही प्रशासनाने नियुक्त केलेल्या समितीने केल्याचे दिसून येत नाही.

तिसऱ्या प्रकरणात एका महिलेने मुख्याध्यापकांच्या दादागिरी व मानसिक छळाबाबत तक्रार केलेली आहे व चौकशी समितीने सर्वांना समज देऊन तक्रार निकाली काढली आहे.

समितीने एखादा पुरुष मुख्याध्यापक महिलेचा मानसिक छळ करीत असेल तर त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई केली पाहिजे. त्याऐवजी केवळ समज देण्यात आली आहे.

चौथ्या प्रकरणात तक्रारदार महिला श्रीमती हिवराळे या कामावर नाहीत, त्यांचा पत्ता व संपर्क क्रमांक उपलब्ध होत नाही, या कारणास्तव तक्रार निकाली काढण्यात आली आहे.

समितीने श्रीमती हिवराळे या जर जिल्हा परिषदेच्या कर्मचारी असतील तर त्या कोठे कार्यरत आहेत, त्यांच्या निवासाचा पत्ता काय आहे, याची माहिती जिल्हा परिषदेकडे असणे आवश्यक आहे.

विशाखा समितीच्या सदस्यांनी श्रीमती हिवराळे यांची तक्रार दिनांक १६/०५/२०११ रोजी प्राप्त झाली होती. नेमकी तक्रार काय आहे, हे जाणून घेण्यासाठी तक्रार अर्जावर नमूद केलेल्या प्राथमिक शाळेत समिती जाऊन आली आहे. तक्रारदार महिलेने त्यांच्या अर्जात या शाळेचा पत्ता नमूद केला होता. परंतु, त्या तेथे उपलब्ध झाल्या नाहीत. त्याचप्रमाणे त्यांचा दूरध्वनी क्रमांकदेखील मिळविण्याचा प्रयत्न समितीने केला होता. परंतु, तोही उपलब्ध झाला नाही. त्यांनी ज्या शाळेचा उल्लेख तक्रार अर्जात केला होता, त्या शाळेकडूनही माहिती मिळविण्यात आली आहे. त्या शाळेने असे लेखी लिहून दिले आहे की, अशा प्रकारची कोणतीही महिला या शाळेत कार्यरत नव्हती. ही सर्व कार्यवाही केल्यानंतरही तक्रारदाराचा सुगावा न लागल्यामुळे व व्हेग तक्रार असल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्याचा निर्णय समितीने घेतला आहे, असे समितीस सांगितले.



समितीने शिक्षण विभागाच्या आस्थापना शाखेकडे या महिलेबाबत चौकशी केली का ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशाखा समितीच्या सदस्यांनी शिक्षण विभागाकडे चौकशी केलेली नाही. तथापि, तशी चौकशी आता केली जाईल. तसेच या विषयाच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे समितीला सादर करण्यात येतील. सदर प्रकरणाची चौकशी थांबविण्यात आली ती योग्य नाही. महिला तक्रार समितीच्या अध्यक्ष वर्ग एकचे अधिकारी आहेत. सदर प्रकरणात दबाव वगैरे आलेला नव्हता. प्रकरणांची नव्याने चौकशी करण्यात येईल, असे समितीस सांगितले.

समितीच्या कार्यप्रणालीबद्दल शंका उपस्थित होते त्यामुळे या केसची पुन्हा चौकशी करण्यात यावी, अशी सूचना केली.

समितीने श्री. जंजाळ यांच्या विरुद्ध किती महिलांनी तक्रारी केल्या होत्या ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रेकॉर्ड मागवून सांगतो. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ज्या महिलांनी तक्रारी केलेल्या आहेत त्यांना समितीसमोर बोलावण्याची व्यवस्था करण्यात येईल, असे समितीस सांगितले.

समितीने सौ. कुंभारे याची तक्रार पोलीस अखत्यारीतील असल्यामुळे हे प्रकरण पुन्हा आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे.

समितीने क्रिमिनल केस असल्यामुळे प्रकरण विभागाकडे पाठवून देणे योग्य नाही अशी सूचना केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणाची चौकशी थांबविण्यात आली ती योग्य नाही, असे समितीस सांगितले.

समितीने या प्रकरणामध्ये कोणाचा दबाव आला होता काय ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिला तक्रार समितीच्या अध्यक्ष वर्ग एकचे अधिकारी आहेत. सदर प्रकरणात दबाव वगैरे आलेला नव्हता असे समितीस सांगितले.

समितीने डॉ. मुरमुरे यांची बदली करून या प्रकरणाला न्याय मिळाला आहे काय ? समितीच्या कार्यप्रणालीबद्दल शंका उपस्थित होते त्यामुळे या केसची पुन्हा चौकशी करण्यात यावी, अशी सूचना केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व प्रकरणांची नव्याने चौकशी करण्यात येईल असे समितीस सांगितले.

समितीने श्री. पार हे दोषी आढळून आल्यामुळे त्यांच्या दोन वेतनवाढी तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आलेल्या आहेत. या प्रकरणाची फेरचौकशी करून समितीला त्यासंदर्भात माहिती उपलब्ध करून देण्यात यावी अशी सूचना केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ठीक आहे, समितीला त्यासंदर्भात माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले आहे. कुटुंबातील मारहाण, लैगिंक छळ व इ. तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्ट्या असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी समुपदेशक व सल्लागार यांची निवड व त्यांच्या मानधनावर खर्च करण्यात येतो. तालुका व जिल्हा पातळीवरील समुपदेशकाला रु. ९००० मानधन देण्यात येते. पंचायत समित्याच्या कार्यालयात महिलासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत, असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेमध्ये विशाखा समिती आहे का? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशाखा समितीनुसार आमच्याकडे महिला तक्रार निवारण समिती स्थापन केलेली आहे आणि जिल्हा परिषदेचे डेप्युटी सीईओ या महिला अधिकारी समितीच्या अध्यक्षा आहेत. तसेच १० तक्रारींबाबत आम्ही समितीसमोर अनुपालन सादर केलेले आहे. त्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषदेला त्याची पुन्हा चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे या सर्व १० केसेसची फेर सुनावणी घेतलेली आहे असे समितीस सांगितले.

तक्रार क्रमांक १ ही जिल्हा परिषद कन्नड येथून होती. दिनांक ५.३.२०११ रोजी बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती मोरे यांनी या प्रकरणामध्ये चौकशी केलेली आहे. या चौकशीमध्ये तथ्य नसल्याचे त्यांनी अहवालामध्ये कळविले होते. परंतु पुन्हा त्याची फेरसुनावणी करण्यात आली तेव्हा तक्रारदार हजर राहिले नाहीत. सदरची तक्रार ही निनावी स्वरूपाची होती. त्यामुळे आम्ही पूर्वीचा अहवाल ग्राह्य धरला आहे.

आजच्या स्थितीला जिल्हा परिषदेकडे एकही तक्रार प्रलंबित नाही. सर्व तक्रारी निकाली काढलेल्या आहेत. दुसरी तक्रार दिनांक २० एप्रिल, २०११ रोजी प्राप्त झाली होती. सदरहू तक्रार श्रीमती गीता उमेश बावत या महिलेची होती. त्यामुळे त्या महिलेची आरोग्य विभागातून बदली करण्यात आलेली आहे. त्यांना पंचायत समिती, फुलंब्री येथे पदस्थापना देण्यात आली आहे. त्यांना दिनांक ३०/१०/२०१५ रोजी पुन्हा सुनावणीसाठी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी लेखी स्वरूपात सादर केले की, त्यांची आता कोणतीही तक्रार नाही असे समितीस सांगितले.



समितीने आरोग्य विभागाला इतर विभागाच्या तुलनेने काम कमी असते काय ? जास्तीत जास्त तक्रारी या डॉक्टर, नर्सेस किंवा आरोग्य विभागातील महिलांच्याच असतात, अशी सूचना केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तिसरी तक्रार पंचायत समिती, पैठण येथील होती. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, थेटगांव, केंद्र पाचोड, ता.पैठण येथील शिक्षिकांनी मुख्याध्यापक श्री.नलावडे यांच्या दादागिरी आणि मानसिक छळाच्या बाबतीत तक्रार केली होती. या संदर्भात शिक्षणाधिकारी यांनी दिनांक १६ ऑगस्ट २०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना अहवाल सादर केला होता. परंतु दिनांक ३० ऑक्टोबर २०१५ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी संबंधित तक्रारदाराने त्यांचे सद्य:स्थितीत काहीही म्हणणे नाही असे लेखी स्वरूपात सादर केलेले आहे, असे समितीस सांगितले.

समितीने दुसऱ्या तक्रारदारानेसुद्धा आमची कोणतीही तक्रार नाही अशा प्रकारचे लेखी स्वरूपात सादर केले आहे. अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व तक्रारदारांची दि. ३० ऑक्टोबर २०१५ रोजी पुन्हा सुनावणी घेतली होती. त्यावेळी त्यांनी समक्ष येऊन अशा प्रकारे लेखी स्वरूपात सादर केले, अशी माहिती समितीस दिली.

समितीने शिक्षक हे मद्यप्राशन करतात. जर ते मद्यप्राशन करीत असतील तर, ते विद्यार्थ्यांसमोर काय आदर्श ठेवणार ? ही बाब अतिशय चुकीची आहे अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जर चौकशी अहवालामध्ये असे काही निदर्शनास आले तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

समितीने काही मुख्याध्यापक हे नेहमीच मद्यप्राशन करतात अशा मुख्याध्यापकांना निलंबित करावयास पाहिजे, अशा मुख्याध्यापकांना निलंबित न करणाऱ्या अधिकाऱ्यांचीच चौकशी केली पाहिजे, अशी सूचना केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरण सन २०११ मधील आहे. जिल्हा परिषदेने दि.३०/१०/२०१५ रोजी सुनावणी घेतली. त्या सुनावणीच्या वेळी तक्रारदारांनी त्यांची कोणतीही तक्रार नाही असे लेखी स्वरूपात सादर केल्यामुळे तक्रार अर्ज निकाली काढला.

समितीने तक्रार करणाऱ्या महिलांवर दबाव येतो काय ? असे असेल तर ते चुकीचे आहे. फेर-सुनावणीचा अहवाल काय आहे ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू चौकशी सन २०११ मध्ये करण्यात आली होती. परंतु समितीने निदेश दिल्यानुसार पुन्हा सुनावणी घेण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत कारवाई करण्यात आली होती. तसेच फेरसुनावणीच्या वेळी त्यांनी लेखी स्वरूपात सादर केले की, त्यांची कोणतीही तक्रार नाही. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांच्याकडे हे काम दिलेले आहे, असे समितीस सांगितले.

चौथी तक्रार पंचायत समिती, औरंगाबाद येथून दिनांक १६ मे २०११ रोजी श्रीमती चित्रलेखा हिवराळे यांनी शिक्षण विभागातील कारकूनच्या विरोधात केली होती. सदरहू प्रकरणात दि. ३० ऑक्टोबर २०१५ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली होती. परंतु त्यावेळी संबंधित तक्रारदार महिलेशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे अगोदर जी चौकशी झाली होती त्यानुसार बालविकास प्रकल्प अधिकारी, प्रकल्प-२ यांच्या दि. १९ सप्टेंबर २०११ रोजीच्या अहवालाच्या आधारे प्रकरण निकाली काढावे असे ठरविण्यात आले होते

आणि तो निर्णय कायम करण्यात आला आहे. फेरसुनावणीला उपस्थित राहण्यास कळविण्यासाठी संबंधित तक्रारदार महिलेशी संपर्क होऊ शकला नाही. सदर शिक्षिका रांजणगांव (शेणपुंजी), ता.गंगापूर येथे कार्यरत नाहीत व त्यांचा पत्ता तसेच संपर्क क्रमांक उपलब्ध नाही, असा अहवाल सादर केला होता. संबंधित अधिकाऱ्यांना शाळेत पाठवून सदरहू महिलेच्या बाबतीत चौकशी केली होती. परंतु शाळेकडून समजले की, अशा नावाची कोणतीही महिला तेथे कार्यरत नाही. महिलेने तक्रारीमध्ये ज्या शाळेच्या नावाचा उल्लेख केला त्या शाळेमध्ये सदर नावाची महिला शिक्षिकाच नाही. याबाबत संबंधितांकडून अहवाल प्राप्त झालेला आहे, असे समितीस सांगितले.

पाचवी तक्रार श्री.पी.व्ही.जंजाळ, ग्रामसेवक, तालुका अध्यक्ष ग्रामसेवक संघटना, तालुका कन्नड यांच्या विरुद्ध होती. सदर तक्रारीची चौकशी बालविकास प्रकल्प अधिकारी-२ श्रीमती उषा मोरे यांच्याकडून करण्यात आलेली आहे. तक्रारीमध्ये काहीही तथ्य नाही असे त्यांनी कळविले आहे. तक्रारीवरून संबंधित ग्रामसेवकाची बदली करण्यात आलेली आहे. तक्रारदार महिलांने लेखी कळविले आहे की, त्यांची बदली करण्यात आल्यामुळे आज कोणतीही तक्रार नाही. तसेच सदर प्रकरणाची चौकशी महिला अधिकाऱ्यांनी केली आहे. चौकशी अहवालात तथ्य आढळून आले नाही असे सादर करण्यात आले आहे, असे समितीस सांगितले.

श्रीमती प्रमिला कुंभारे यांची तक्रार आरोग्य विभागामार्फत आहे. श्री.ए.वाय.मगरे, आरोग्य सहायक जिल्हा प्रशिक्षण संघ, औरंगाबाद यांच्याकडून त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. संबंधित तक्रारीमध्ये एफआयआर दाखल झालेला आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. श्री.मगरे यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आली आहे. ते सध्या पैठण येथे कार्यरत आहेत.

पंचायत समिती वैजापूर येथील जिल्हा परिषद प्रशाळा खंडाळा येथील तक्रार मुख्याध्यापकांविरुद्ध आहे. सदर प्रकरणांमधील संचिकेचा शोध घेतला असता ती सापडली नाही. ती गहाळ झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे ज्या कर्मचाऱ्याची जबाबदारी होती त्या संबंधित कर्मचाऱ्याला आम्ही कारणे दाखवा नोटीस इश्यू केली आहे. त्याच्याविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. परंतु, मध्यंतरी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व गट शिक्षणाधिकारी यांना सर्व कागदपत्रांसह पुन्हा अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. जिल्हा परिषद संचिका पुन्हा रि-कन्स्ट्रक्ट करीत आहोत. समितीने सूचना दिल्यानंतर जिल्हा परिषदेने कारवाईस सुरूवात केलेली आहे. त्यामुळे संचिका रि-कन्स्ट्रक्ट करण्याची कार्यवाही सध्या सुरू आहे. तसेच संबंधित शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध ॲक्शन घेण्याची कारवाई सुरू आहे, असे समितीस सांगितले.

श्रीमती राठोड, आरोग्य सेविका (महिला) यांची वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार होती. संबंधित केसमध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा अहवाल अप्राप्त आहे. परंतु, वैद्यकीय अधिकाऱ्यांना लेखी समज देण्यात आली आहे, असे समितीस सांगितले.

समितीने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कोणता त्रास दिला आहे ? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मानसिक छळ केला आहे असे समितीस सांगितले.



श्रीमती घोडके, कनिष्ठ सहायक, खुलताबाद यांची तक्रार होती. दिनांक ३०.१०.२०१५ रोजी पुन्हा सुनावणीसाठी बोलाविले असता श्रीमती घोडके उपस्थित राहिल्या असून त्या आता सेवानिवृत्त झालेल्या आहेत. सदर प्रकरणामध्ये माझे काही म्हणणे नाही असे त्यांनी समितीस लेखी दिलेले आहे.

समितीने तक्रारदार सेवानिवृत्त होईपर्यंत निकाल लावलेला नाही, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यात निकाल लागलेला होता. फेर सुनावणी झाली होती. तरी संबंधित अधिकारी श्री.चाटे यांना समज देण्यात आलेली आहे असे समितीस सांगितले.

श्रीमती निर्मला वाडेकर, सहशिक्षिका यांच्या प्रकरणामध्येसुद्धा संचिका गहाळ झाल्याचे दिसून आले आहे. संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध प्रशासकीय कारवाई सुरू केलेली आहे. गट शिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्यामार्फत संचिका रि-कन्स्ट्रक्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

समितीने 'समज' देणे म्हणजे नेमके काय ? कशा पद्धतीने समज देता ? आज जिल्हापरिषदेकडे किती तक्रारी प्रलंबित आहेत ? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखी समज देण्यात येते तसेच संबंधितांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येते. फक्त एक तक्रार न्यायप्रविष्ट आहे. त्यावर निकाल होणे बाकी आहे. सद्य:स्थितीत जिल्हा परिषदेकडे एकही तक्रार प्रलंबित नाही असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

शासनाच्या विविध कार्यालयात पुरुषांद्वारे महिलांचा छळ होत असल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाने विशाखा विरुद्ध राजस्थान या प्रकरणात कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये लैंगिक सतावणुकीबाबत महिला कर्मचाऱ्यांकडून शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांविरुद्ध करण्यात येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी 'तक्रार निवारण कक्ष' स्थापन करण्याच्या अनुषंगाने शासनाने राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयातील महिला कर्मचारीवृंदांच्या तक्रार निवारणासाठी प्रत्येक आस्थापनेमध्ये तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार औरंगाबाद जिल्हा परिषदेत अशी तक्रार निवारण समिती स्थापन केली आहे किंवा कसे याबाबत समितीने विचारलेल्या प्रश्नावर लेखी स्वरूपात पाठविलेली माहिती अशी आहे की महिला अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता जिल्हा परिषदेमार्फत तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. सन २०१० ते २०१२ या कालावधीत महिलांच्या छळवणुकीबाबत एकूण १२ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. दोन तक्रारींमध्ये चौकशी अहवालानुसार आरोपी अधिकाऱ्यांचा कार्यभार हस्तांतरित करण्यात आला आहे. तर १ तक्रार आरोग्य विभागास परत पाठविण्यात आली असून १ चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला असून एका तक्रारीवर चौकशी सुरू आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीच्या वेळी उपरोक्त नमूद केलेल्या तक्रारींबाबत उहापोह केला असता आरोग्य विभागातील एका महिलेने तक्रार केल्यामुळे तिची दुसरीकडे बदली केली. परंतु ज्या कर्मचाऱ्याविरुद्ध सदर महिलेने तक्रार केली होती त्याचेविरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही. ज्या तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत त्यामध्ये पुरुष अधिकाऱ्यांमार्फत दादागिरी व मानसिक छळ, एका महिलेचा संपर्क व पत्ता आढळून येत नाही, तसेच एका प्रकरणात महिलेने पोलीस स्टेशनला तक्रार केल्यामुळे या सर्व तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. एकंदरच औरंगाबाद जिल्हा परिषदेत कार्यरत असलेल्या महिला तक्रार निवारण समितीचे कामकाज हे महिलांची छळवणूक करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना पाठीशी घालण्याचे दिसून येत आहे. ज्या महिलेने मानसिक छळाबद्दल तक्रार केली आहे त्या कर्मचाऱ्याविरुद्ध काहीही कारवाई न होणे, ज्या महिलेने तक्रार केली आहे ती महिला आढळून न येणे याचाच अर्थ सदरची तक्रार निनावी असून त्याबाबतदेखील वस्तुस्थितीबाबत चौकशी न करणे, तर एका महिलेने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली म्हणून प्रशासकीय स्वरूपाची कार्यवाही न करणे या बाबी समितीला अनाकलनीय वाटतात. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये तक्रार निवारण समितीने पुरेशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पाठराखण केली असल्याचे दिसून येते व त्यांनी या सर्व प्रकरणांमध्ये कोणाच्यातरी दबावाखाली काम केले असल्याची शक्यता नाकारता येत नाही असे समितीचे ठाम मत आहे.

विभागीय साक्षीच्या वेळीदेखील या प्रकरणी विचारणा केली असता या सर्व १० प्रकरणांमध्ये फेर सुनावणी घेतली असल्याचे समितीला सांगण्यात आले. त्यात एका प्रकरणी चौकशीत तथ्य आढळून आले नाही, दुसऱ्या प्रकरणी आरोग्य विभागातील महिलेची बदली करणे, तिसऱ्या प्रकरणात मुख्याध्यापकाची दादागिरी आणि मानसिक छळ याबाबत तक्रारकर्त्या महिलेने सद्यःस्थितीत त्यांचेविरुद्ध काहीही म्हणणे नाही असे लेखी स्वरुपात सादर करणे, एकंदरीतच या सर्व प्रकरणांमध्ये वेळीच कार्यवाही न झाल्यामुळे या प्रकरणांचा निपटारा अशा पद्धतीने करण्यात आला असल्याचा समितीला दाट संशय आहे आणि फेर चौकशी करुनही त्यामध्ये काहीही निष्पन्न न होणे याचाच अर्थ जो पुरुष अधिकारी/कर्मचारी या प्रकरणांमध्ये सामिल होता त्यांनी संबंधित तक्रार करणाऱ्या महिलांवर स्वतः अथवा इतरांमार्फत दबाव निर्माण केला असल्याची साधार संशय समितीला वाटतो. कारण महिलांच्या तक्रारींसंदर्भात एक तर ती मागे घेणे, अनुपस्थित राहणे अथवा काहीही म्हणणे नाही असा अभिप्राय नोंदविणे. म्हणजेच संबंधित महिलांवर या ना त्या कारणाने पुरुष अधिकारी/कर्मचाऱ्यांनी दबाव आणून प्रकरणे निकाली काढली असा समितीला दाट संशय आहे. एका तक्रारीमध्ये संचिका गहाळ होणे व त्या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यावर अजूनही कारवाई सुरू असणे, बहुतांशी तक्रारींमध्ये छळवणूक व मानसिक त्रास असे नमूद केले आहे. सदरची छळवणूक ही मुद्दाम अथवा कामाच्या रूपाने लैंगिक सतावणुकीबाबत केली जाते आणि त्याच आधारे महिला प्रशासनाकडे अथवा तक्रार निवारण समितीकडे तक्रारी करीत असतात. अशा तक्रारी जर वेळीच निकाली निघाल्या नाहीत तर कसूरवार अधिकारी/ कर्मचारी संबंधित महिलेवर या ना त्या कारणाने दबाव आणून एक तर तक्रार मागे घेणे, संबंधित तक्रारी संबंधात माझे काहीही म्हणणे नसणे किंवा संबंधित महिलेची बदली करणे या बाबी आढळून येतात. याचाच अर्थ संबंधित महिलेला त्या प्रकरणामध्ये योग्य न्याय मिळत नाही असे समितीचे मत आहे.



औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये तक्रार निवारण समितीकडे मोठ्या प्रमाणावर प्राप्त झालेल्या तक्रारी व त्यावर तक्रार निवारण समितीने केलेली कारवाई विचारात घेता या जिल्हा परिषदेतील तक्रार निवारण समितीने कसूरवार अधिकारी कर्मचाऱ्यांवर जुजबी स्वरुपाची कारवाई करून तक्रारी निकाली काढल्या असल्याचे तसेच अनेक तक्रारदार महिलांची नावे उघड केली असल्याचे दिसून येते. यामुळे संबंधित महिलांची बेअदबी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या तक्रारदार महिलांची नावे कोणत्याही परिस्थितीमध्ये गोपनीय ठेवण्यात यावी. जेणेकरून पिडित महिला तक्रार दाखल करण्यास तयार होतील. **तसेच जिल्हा परिषदेतील तक्रार निवारण समितीने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच दिनांक १९ सप्टेंबर २००६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली नाही. कारण महिलांद्वारा त्यांच्या छळाबाबतच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी दाखल होऊनही कसूरवार अधिकाऱ्यांवर पाहिजे त्या प्रमाणात कारवाई केलेली नाही. अशाच प्रकारे राज्यात इतरही ठिकाणी तक्रारी निकाली काढण्याचे प्रकार संबंधित तक्रार निवारण समित्यांकडून सुरू असल्याचे समितीला आढळून आले आहे. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणुकीस शासकीय/ निमशासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळाच्या समस्यांची तपासणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या तक्रार निवारण समितीने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना व त्या अनुषंगाने उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार कसूरवार पुरुष अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर पिडित महिलेला न्याय देण्यासाठी वेळीच कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने कठोरपणे कारवाई करणे समितीला अभिप्रेत आहे.**

**सबब, तक्रार निवारण समितीकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रचलित नियमानुसार सदरची तक्रार ही कोणत्याही परिस्थितीमध्ये तीन महिन्यात निकाली काढण्यात यावी व त्या संदर्भातील कार्यवाहीसह संपूर्ण अहवाल विभाग प्रमुखांकडे पाठविण्यात यावा. अशी कार्यवाही करताना सदरची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीमध्ये गोपनीय व संबंधित महिलेचे नाव उघड न होईल याची दक्षता घेऊन करण्यात यावी व त्या अनुषंगाने शासनाने नवीन परिपत्रक निर्गमित करून सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

**१.४ जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या अंगणवाड्यांचा दर्जा सुधारण्याबाबत :-**

अंगणवाडी सेविकांना पदोन्नती अथवा अंगणवाड्यासाठी खर्च केलेली रक्कम त्या त्या अंगणवाडी केंद्राला देण्यात येते का ? अंगणवाडी सेविकांना पदोन्नती किंवा अन्य प्रोत्साहनात्मक लाभ देण्यात येतो का ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी औरंगाबाद, जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

या जिल्ह्यात अनेक अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळालेले आहे, अन्य राज्यातील अधिकारी तसेच परदेशातील प्रतिनिधीही या अंगणवाड्या बघण्यासाठी येथे येत असतात. या अंगणवाड्यांचा कायापालट करण्यासाठी लोकसहभागातून निधी उभारण्यात आला आहे. ही विशेष बाब आहे. रोख रुपये ५ हजार व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

**औरंगाबाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिनांक १० जुलै २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अंगणवाडी कार्यकर्ती पुरस्काराचे निकष काय आहेत ? किती अंगणवाडी सेविकांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्येक तालुक्यातून ३ सेविकांची निवड केली जाते. उत्कृष्ट काम केलेल्या सेविकांना पुरस्कार दिला जातो. या जिल्ह्यात अनेक अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळालेले आहे, ही खूप मानाची गोष्ट आहे. अन्य राज्यातील अधिकारी या अंगणवाड्या बघण्यासाठी येथे येत असतात. एवढेच नव्हे तर परदेशातील प्रतिनिधीही येत असतात. विशेष बाब ही आहे की, या अंगणवाड्यांचा कायापालट करण्यासाठी लोकसहभागातून निधी उभारण्यात आला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने अंगणवाडी सेविकांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराची रक्कम तुटपुंजी आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविकांना पदोन्नती किंवा अन्य प्रोत्साहनात्मक लाभ मिळावा, असे वाटते का ? ही तरतूद कमी असल्यामुळे त्यामध्ये वाढ करावी अशी सूचना केली. त्यावर अधिकाऱ्यांनी रोख रुपये ५ हजार व प्रमाणपत्र, असे पुरस्काराचे स्वरुप आहे. एखाद्या संस्थेला आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळाले तर त्या संस्थेने केलेला खर्च त्यांना परत दिला जातो. अंगणवाड्यांच्या दर्जावाढीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येत असतो. या जिल्ह्यात अनेक ठिकाणी लोकसहभागातून हे काम करण्यात आले आहे. एका अंगणवाडीसाठी रुपये १० ते २० हजार रुपयांपर्यंत खर्च येत असतो. मराठवाड्यामध्ये साधारणपणे १००० अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्यामुळे या अंगणवाड्यांसाठी झालेला खर्च शासनाने त्यांना परत द्यावा असे समितीस सांगितले.

समितीने अंगणवाड्यांना साहित्य पुरवणे यासंदर्भात सन २०१३-२०१४ या वर्षात खर्च न करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

अधिकाऱ्यांनी सन २०११-२०१२ या वर्षात १४.९९ लक्ष रुपये व सन २०१२-२०१३ या वर्षात १९.९९ लक्ष रुपये खर्च करण्यात आले होते. परंतु सन २०१३-२०१४ या वर्षात महिलांच्या सक्षमीकरण योजनांवर तरतूद करण्यात आली नव्हती असे समितीस सांगितले.

समितीने अंगणवाडयांना देण्यात येणारे साहित्य आणि औषधे यामध्ये फरक आहे. औषधे हे साहित्यामध्ये येत नाही. अशी सूचना केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अंगणवाड्यांना औषधे उपलब्ध करून दिली जात असतात. बऱ्याच अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळालेले आहे. लोक सहभागातून अंगणवाडयांचे बरेच चांगले काम झालेले आहे. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अंगणवाड्यांसाठी जे काही साहित्य खरेदी करण्यात आले ते आरसीप्रमाणे खरेदी करण्यात आले होते. अंगणवाड्यांसाठी मुबलक प्रमाणात साहित्य खरेदी करण्यात आले असल्यामुळे सन २०१३-२०१४ मध्ये तरतूद करण्याची आवश्यकता राहिली नाही असे समितीस सांगितले.



समितीने अंगणवाडीतील बालकांना अतिरिक्त आहार पुरवणे यासाठी सन २०११-२०१२ या वर्षामध्ये रुपये ३९,९९,९८३ खर्च करण्यात आला आहे. यामध्ये बालकांना कोणता आहार देण्यात आला होता ? अशी विचारणा केली.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अंगणवाडी बालकांना अतिरिक्त आहारामध्ये औषधे, व्हीटॅमीन सिरप, कॅल्शीयम सिरप, बिस्कीटे, रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याची औषधे खरेदी करण्यात आली आहेत असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने मराठवाड्यामध्ये एकूण १००० अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळालेले असून जिल्हा परिषदेकडून लोकसहभागातून अंगणवाड्यांचा दर्जा सुधारण्यात येतो, त्याकरिता सुमारे रुपये १० ते २० हजार खर्च येतो. ज्या अंगणवाड्यांना आय.एस.ओ.दर्जा मिळालेला आहे, अशा अंगणवाडी सेविकांना पदोन्नती व अंगणवाड्यांसाठी खर्च केलेली रक्कम त्या-त्या अंगणवाडी केंद्राला देण्यात येते किंवा कसे ? औरंगाबादमधील ग्रामीण विभागामध्ये मायनॉरिटीच्या अंगणवाड्या आहेत का? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी अहवालाच्या दिवशी औरंगाबाद जिल्ह्यात ८५६ अंगणवाड्यांना आय.एस.ओ. मानांकन प्राप्त झाले होते. औरंगाबादमधील ग्रामीण विभागामध्ये मायनॉरिटीच्या अंगणवाड्या आहेत असे समितीस सांगितले.

समितीने अल्पसंख्याक विभागाच्या अंगणवाड्या काढणे गरजेचे आहे. आवश्यकतेनुसार तेथे अंगणवाडया सुरू करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करावा. अशी सूचना केली असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अल्पसंख्याक विभागात अंगणवाड्याच काढलेल्या नाहीत, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची गळती वाढण्यामागचे हे देखील एक मुख्य कारण आहे. अल्प संख्याक विभागाच्या अंगणवाड्या सुरू करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला भेट देऊन तेथील अंगणवाड्यांची स्थिती, अंगणवाडी सेविकांना व मदतनिसांना देण्यात येणारे पुरस्कार व देण्यात येणारे निकष त्याचप्रमाणे या जिल्हा परिषदेत अनेक अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळालेले असल्यामुळे याबाबतची स्थिती जाणून घेण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली असता, त्यांनी प्रत्येक तालुक्यातून तीन अंगणवाडी सेविकांची त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कारासाठी निवड केली जाते. या जिल्ह्यात अनेक अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळाले असून अन्य राज्यातील अधिकारी या राज्यातील अंगणवाडी बघण्यासाठी येत असतात. सदरच्या अंगणवाड्यांचा कायापालट होण्याचे मुख्य कारण म्हणजे लोक सहभागातून निधी वापरण्यात येऊन त्याद्वारे या अंगणवाडीतील बालकांना विविध साहित्य उपलब्ध करून देण्यात येते. अंगणवाड्यांच्या

सुधारणेसाठी त्या त्या अंगणवाडी परिसरातील नागरिक लोक सहभागाद्वारे मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात येतो. एका अंगणवाडीसाठी सुमारे १० ते २० हजार रुपयांपर्यंत खर्च करण्यात येतो. मराठवाड्यामध्ये साधारणपणे १,००० अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळाले आहे. त्यामुळे या अंगणवाड्यांसाठी झालेला खर्च शासनाने त्यांना परत द्यावा अशी मागणी समितीला भेटीच्या वेळी करण्यात आली. समितीने या अंगणवाड्यांची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता सदरच्या अंगणवाड्यांचा कायापालट हा लोक सहभागातून करण्यात आला असून, या अंगणवाड्यांमध्ये खरेदी करण्यात आलेले साहित्यदेखील दर कराराप्रमाणे करण्यात आले असून मुबलक प्रमाणात साहित्य खरेदी करण्यात आले आहे. सदरच्या अंगणवाड्यांचा दर्जा उत्कृष्ट असून परिसर स्वच्छ व बालकेदेखील निटनेटकी आढळून आली. बालकांना अतिरिक्त आहार पुरविणे यासाठीदेखील मोठ्या प्रमाणावर खर्च केला असल्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस सांगितले त्याचप्रमाणे अंगणवाडी बालकांना अतिरिक्त आहारामध्ये औषधे, व्हीटॅमीन सिरप, कॅल्शीयम सिरप, बिस्कीटे, रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याची औषधे खरेदी करण्यात आली असल्याचे समितीस विदित केले.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने मराठवाड्यामध्ये सुमारे १,००० अंगणवाड्यांना आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळाले असून येथील अंगणवाड्यांचा विकास लोक सहभागातून करण्यात येतो. या अंगणवाड्यांचा दर्जा सुधारण्यासाठी सुमारे १० ते २० हजार रुपये खर्च करण्यात येतो. ज्या अंगणवाड्यांना आय.एस.ओ. दर्जा मिळालेला आहे, अशा अंगणवाडी सेविकांना पदोन्नती व अंगणवाड्यांसाठी खर्च केलेली रक्कम त्या-त्या अंगणवाडी केंद्राला देण्यात येते किंवा कसे? तसेच ग्रामीण विभागामध्ये अल्पसंख्याकांच्या बालकांना अंगणवाड्या आहेत किंवा कसे? अशी विचारणा केली असता, औरंगाबाद जिल्ह्यात ८५६ अंगणवाड्यांना आय.एस.ओ. मानांकन प्राप्त झाले असून तेथे अल्पसंख्याकांच्या बालकांच्या अंगणवाड्या सुरू करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल असे उत्तर देऊन विभागीय सचिवांनी समितीच्या मूळ प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळले. केवळ अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची गळती रोखण्याच्या दृष्टीने अल्पसंख्याक विभागाच्या अंगणवाड्या सुरू करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल असे समितीस सांगितले. तथापि, या अंगणवाड्यांचा दर्जा सुधारण्यासाठी जो १० ते २० हजार रुपये खर्च त्यांना परत करण्याबाबत विभागीय सचिवांनी काहीही भाष्य साक्षीत व्यक्त केले नाही.

**अतः औरंगाबाद जिल्ह्यामध्ये अंगणवाड्यांचा दर्जा सुधारण्यासाठी तेथील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोक सहभागातून प्रत्येक अंगणवाडीवर सुमारे १० ते २० हजार रुपये खर्च करून बालकांना विविध साहित्य उपलब्ध करून देऊन या अंगणवाड्यांचा कायापालट केल्या प्रकरणी समिती संबंधित अधिकाऱ्यांचे अभिनंदन करीत असून त्यांनी केलेल्या कार्याचे तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी औदार्य दाखऊन लोक सहभागातून त्या त्या गावातील अंगणवाड्यांना निधी उपलब्ध करून देऊन अंगणवाड्यांचा कायापालट केल्याप्रकरणी अशा नागरिकांचीदेखील समिती प्रशंसा करते. समितीला साक्षीच्या वेळी अधिकाऱ्यांद्वारा या अंगणवाड्यांचा दर्जा सुधारण्यासाठी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती शासनाकडून व्हावी ही मागणी योग्य वाटत असली तरी सदरची रक्कम ही लोक सहभागातून लोकांनी स्वेच्छेने त्यांची बालके या अंगणवाडीत येत असल्यामुळे सदरची रक्कम न देता प्रशासनाने अंगणवाडी सेविकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याची जी भूमिका घेतली आहे ती रास्त वाटते. या जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांचे काम पाहता त्यांच्या पुरस्काराच्या रकमेत वाढ करण्यात यावी तसेच पुरस्कार देताना अंगणवाडी सेविकांच्या कार्यक्षमतेची जाणीव ठेऊन त्यांच्या पुरस्कार संख्येतदेखील वाढ करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**



**१.५ शासकीय वसतिगृह पद्मपुरा :-**

समितीने शासकीय वसतिगृह पद्मपुरा येथील कन्या वसतिगृहात विद्यार्थीनीचे आरोग्य तपासणीसाठी महिला स्त्री-रोग तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे ? अशी विचारणा केली.

**शासकीय वसतिगृह पद्मपुरा येथील मुख्याध्यापकाची साक्ष :-**

शासकीय वसतिगृह पद्मपुरा येथे दिनांक १० जुलै २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्याध्यापिका यांनी वसतिगृहात एकूण २५० मुली राहतात. मुलींसाठी २५ संगणक असून या संगणकाचा उपयोग सरावासाठी केला जातो. वसतिगृहातील एका खोलीमध्ये साधारणपणे ४ ते ५ मुलींच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. खोल्यांची स्वच्छता ठेवण्याचे काम विद्यार्थींनी स्वखुशीने करतात. मुलींच्या दैनंदिन भोजन, न्याहारीचीही व्यवस्था या वसतिगृहात करण्यात आली आहे. दैनंदिन भोजन व न्याहारीमध्ये डाळ, भात, चपाती, भाजी, दूध, केळी, बिस्कीट व अंडी दिली जातात. बुधवार व रविवार या दिवशी मांसाहार घेणाऱ्या विद्यार्थीनींना मांसाहारी जेवण व मांसाहर न घेणाऱ्या विद्यार्थीनींना गोड जेवण दिले जाते. विद्यार्थीनींना शिक्षणासाठी वह्या, फुल स्केप पेपर वगैरे स्टेशनरी दिली जाते. तसेच गणवेशही दिला जातो. विद्यार्थीनींच्या आरोग्य तपासणीसाठी स्त्री-रोग तज्ज्ञ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याबाबत समितीच्या निदर्शनास आणून दिली. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

शासकीय वसतिगृह पद्मपुरा येथे दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीसाठी विभागीय समाज कल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना पत्राद्वारे कळवूनही ते साक्षीच्या वेळी उपस्थित राहिले नव्हते. साक्षीच्या वेळी समितीने शासकीय वसतिगृह, पद्मपुरा येथील कन्या वसतिगृहाची पाहणी केली असता विद्यार्थीनींच्या आरोग्य तपासणीसाठी महिला स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे ? अशी विचारणा केली.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विभागीय सचिवांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जास्तीत जास्त महिलांच्या आरोग्याची तपासणी करावी अशा सूचना दिल्या जातील असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने शासकीय वसतिगृह पद्मपुरा येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने वसतिगृहात एकूण २५० मुली राहतात. मुलींसाठी २५ संगणक असून एका खोलीमध्ये साधारणपणे ४ ते ५ मुलींच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. मुलींच्या दैनंदिन भोजन, न्याहारी याचीही व्यवस्था या वसतिगृहात करण्यात आली आहे. विद्यार्थीनीना शिक्षणासाठी वह्या, फुल स्केप पेपर वगैरे स्टेशनरी दिली जाते. तसेच गणवेशही दिला जातो. विद्यार्थीनीच्या आरोग्य तपासणीसाठी स्त्री-रोग तज्ज्ञ उपलब्ध आहेत किंवा कसे, मुलींच्या आरोग्याची काळजी कशी घेतली जाते इत्यादीबाबत विचारणा केली असता वसतिगृहातील विद्यार्थीनींच्या आरोग्याची तपासणी करण्याकरिता स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता असल्याचे वसतिगृहाच्या अधीक्षकांनी समितीसमोर विशद केले. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय समाजकल्याण अधिकारी यांना कळवूनदेखील ते कोणतेही कारण न देता समितीसमोर उपस्थित राहिले नाहीत. वसतिगृहातील विद्यार्थीनींच्या आरोग्य तपासणीसाठी महिला स्त्री रोग डॉक्टर उपलब्ध करून देण्याबाबत तसेच वसतिगृहातील विद्यार्थीनींच्या आरोग्याची तपासणी कशाप्रकारे केली जाते याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? अशी विचारणा आरोग्य विभागाच्या सचिवांना केली असता, आरोग्य विभागाचे संचालक यांनी महिला व बाल कल्याण विभागाने अशा ठिकाणी डॉक्टरांकडून वेळोवेळी तपासणी करण्याची व्यवस्था केलेली आहे. स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टर अशा वसतिगृहांना नियमितपणे भेटी देत असतात. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जास्तीत जास्त महिलांच्या आरोग्याची तपासणी करावी अशा त्यांना सूचना दिलेल्या आहेत. आरोग्य विभागाच्या संचालकांनी असे उत्तर देऊन एकप्रकारे समितीची दिशाभूल केलेली आहे कारण समितीला ज्या मुली त्यांच्या पालकांना सोडून शासनाने नियुक्त केलेल्या महिला/ पुरुष अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पालकत्वाअंतर्गत वसतिगृहात राहात असतात यात या अधिकारी कर्मचाऱ्यांकडून मुलींच्या आरोग्य विषयक बाबीकडे प्रचंडपणे हेळसांड होत असल्यामुळे समितीने या मुलींना आरोग्य व लैंगिक समस्याबाबत स्त्री रोग तज्ज्ञ महिला डॉक्टरकडून योग्य ती सेवा व सल्ला मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे वाटते व त्यासाठी समितीने असा प्रश्न संबंधित अधिकाऱ्यांना विचारला. संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबीचे भान ठेऊन समितीला सकारात्मक उत्तर देणे हे अपेक्षित होते. परंतु त्यांनी समितीसमोर येऊन केवळ वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला आहे असे समितीला वाटते. कारण आरोग्य संचालकांनी या बाबीवर सकारात्मक भूमिका घेऊन शासनाची भूमिका व मोठ्या प्रमाणावरील मुलींना अपेक्षित सुविधा याबाबत सकारात्मक भाष्य करणे आवश्यक असतानादेखील ते न करणे तसेच याबाबत विभागीय सचिवांनी देखील धोरणात्मक निर्णयासंदर्भात समितीला अपेक्षित माहिती देणे आवश्यक होते. परंतु त्यांनीदेखील या गंभीर विषयावर कोणतेही भाष्य केले नाही याबाबत समिती खेद व्यक्त करते.

पद्मपुरा येथील शासकीय वसतिगृहात सुमारे २५० मुली राहतात. राज्यातही शासनाची व शासन अनुदानित अशी अनेक मुलींची वसतिगृहे असून त्यात हजारो मुली राहत असून शिक्षण घेत असतात. सदर मुली बहुदा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, दुर्बल घटक व इतर वंचित घटकामधल्या असतात. ज्या शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने त्यांची निवासी वसतिगृहात



शिक्षणाची व्यवस्था केली आहे. या मुली साधारणतः १५ ते २० वर्षे किशोरवयीन असतात. त्या साधारणतः अल्पवयीन असतात. सदर मुलींना मासिक पाळीच्या वेळी पोट दुखणे, मानसिक तणाव, रक्तक्षय, पोटाचे आजार, मानसिक पाळीचे गंभीर आजार तसेच इतरही लैंगिक समस्या असतात. सदर मुलींचे वास्तव्य वसतिगृहात तर शिक्षण शाळा-महाविद्यालयात घेत असतात. वसतिगृहांच्या नियमाप्रमाणे सदर मुलींना अधीक्षक अथवा वॉर्डनच्या अनुमतीने बाहेर जाण्यास वाव असतो. तथापि, त्यात निश्चित अशा कालावधीचे बंधन घालून दिलेले असते. तसेच या मुली महिनोंमहिने त्यांच्या पालकांपासून दूर असतात. त्यामुळे त्यांचे पालकदेखील त्यांच्या आरोग्य विषयक समस्यांकडे हवे तेवढे लक्ष देण्यास समर्थ नसतात. त्यामुळे सदरच्या मुलींना आरोग्याच्या संदर्भात वसतिगृहाच्या महिला कर्मचाऱ्यांवरच अवलंबून राहावे लागते. त्यातही या महिला कर्मचाऱ्यांवर वसतिगृहातील मोठ्या प्रमाणावरील मुलींची संख्या, मुलींना देण्यात येणाऱ्या पाठ्यपुस्तके, लेखन सामुग्री, आहार व्यवस्था, इतर सुविधा इत्यादी बाबींचे पर्यवेक्षण व जबाबदारी मोठ्या प्रमाणावर असते. **आरोग्यविषयक सुविधा ही बाब अत्यंत गंभीर बाब असल्याने त्याविषयी शासनाने अत्यंत जागरुक राहून राज्यातील वसतिगृहात राहणाऱ्या प्रत्येक मुलींच्याकरिता स्वतंत्र आरोग्य तपासणी विषयक यंत्रणा निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. सद्यःस्थितीतील आरोग्य विषयक यंत्रणा निश्चित शासन निर्णय करून निर्माण केलेली नसल्यामुळे मुलींची वैद्यकीय तपासणी करणे त्यांना बंधनकारक नाही. यास्तव राज्यातील प्रत्येक मुलींच्या वसतिगृहात वास्तव्य करीत असलेल्या मुलींना त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांचे निवारण करण्यासाठी आरोग्य विभागाने स्वतंत्र आरोग्यविषयक यंत्रणा निर्माण करून त्याचे वेळापत्रक निश्चित करून प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेला वसतिगृहातील मुलींची आरोग्यविषयक व लैंगिक बाबीविषयक नियमित तपासणी करण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या नियंत्रणाखाली शासकीय सेवेत असलेल्या तज्ज्ञ स्त्री वैद्यकीय अधिकाऱ्यांची अथवा तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करून अशा तज्ज्ञ स्त्री वैद्यकीय अधिकारी/ तज्ज्ञ स्त्री डॉक्टर यांच्या पथकाद्वारे आरोग्य विषयक समस्या भेडसावणाऱ्या मुलींची नियमित तपासणी करुन आवश्यक तो औषधोपचार करणे बंधनकारक करावे व त्यासाठी शासनाने सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच विभागीय साक्षीच्या वेळी विभागीय समाजकल्याण अधिकारी यांना समितीसमोर उपस्थित राहण्याचे कळवूनदेखील त्यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबत कोणतेही कारण अथवा पत्र समितीकडे सादर न करता जाणीवपूर्वक समितीच्या बैठकीला अनुपस्थित राहिले याबाबत त्यांना कडक स्वरूपात समज देण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

**उपरोक्त समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात विभागाने कार्यवाही करून त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

**१.६ सावित्रीबाई महिला वसतिगृह :-**

सावित्रीबाई महिला वसतिगृह, औरंगाबाद ही इमारत भाड्याने असून मालकाने भाडे वाढवून प्रस्ताव सादर केला आहे हे खरे आहे काय ? असल्यास सद्यःस्थिती काय आहे ? सदर वसतिगृहात पिडित महिला

कुमारी माता वेश्या व्यवसायातून सोडवणूक करण्यात आलेल्या महिला, महिला मनोरुग्ण, महिला मुकबधिर, निराधार महिला व महिला गुन्हेगार ठेवण्यात येतात हे खरे आहे काय ? सदर वसतिगृहात महिला गुन्हेगारांना ठेवण्यात आले होते हेही खरे आहे काय ? अशी विचारणा करण्यात आली.

**सावित्रीबाई महिला वसतिगृह येथील अधीक्षकांची साक्ष :-**

सावित्रीबाई महिला वसतिगृह येथे दिनांक १० जुलै २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी अधिक्षिका यांनी सदर वसतिगृह भाड्याच्या इमारतीत असून त्यासाठी प्रतिमाह रक्कम रुपये २०,७०० एवढे भाडे अदा करावे लागते. त्याचप्रमाणे वीज व पाणी यांसाठी अतिरिक्त रक्कम रुपये १०,००० एवढा खर्च येत असतो. मालकाबरोबर केलेला पूर्वीचा भाडेपट्टा करारनामा संपुष्टात आला असून आता मालकाने भाड्यापोटी प्रति-माह रक्कम रुपये ४८,००० एवढ्या रकमेची मागणी केली आहे. यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून भाडे वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्ताव मंजूर झाला नाही तर मालकाबरोबर करण्यात आलेला भाडे करार संपुष्टात येण्याची शक्यता आहे.

शासनाने या वसतिगृहासाठी स्वतःची इमारत बांधावी, यासाठी जिल्हा महिला व बाल कल्याण विभागाने शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. तसेच, वसतिगृहाच्या इमारतीसाठी १० हजार चौरस फूटाचा भूखंड उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिकेकडे केलेली आहे. बाजारभावाप्रमाणे औरंगाबाद शहरात जमीन विकत घेण्याएवढी आर्थिक कुवत वसतिगृह व्यवस्थापनाकडे नाही. त्यामुळे महानगरपालिका किंवा जिल्हाधिकारी यांनी जमीन उपलब्ध करून दिल्यास या संस्थेची इमारत उभी राहू शकेल व दरमहा रुपये ५० हजारांचा खर्च वाचून तो पैसा गरजू, अभागी महिलांवर खर्च करता येऊ शकेल.

महानगरपालिकेने औरंगाबाद शहराच्या बाहेर भूखंड देऊ केला होता. तथापि, हे महिलांचे व विशेषतः पिडित महिलांचे वसतिगृह आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न नेहमीच असतो. म्हणून शहरात भूखंड उपलब्ध करून द्यावा, अशा प्रकारची विनंती केली आहे. या शहरात नगररचना विभागाने शासकीय भूखंड उपलब्ध असल्याची माहिती दिलेली आहे.

या वसतिगृहात पिडित महिला, कुमारी माता, वेश्या व्यवसायातून सोडवणूक करण्यात आलेल्या महिला, निराधार महिला, मनोरुग्ण महिला, मुकबधीर मुली यांना सामावून घेण्यात येत असते. या वसतिगृहात पश्चिम महाराष्ट्र, केरळ, पश्चिम बंगाल या राज्यांतील महिलांनाही ठेवण्यात आले आहे.

वेश्याव्यवसायातून सोडवणूक केलेल्या महिला व अन्य महिला यांच्या वागण्यात मोठा फरक असतो. त्यामुळे त्यांची वेगळीकडे व्यवस्था करणे आवश्यक आहे. पिटा ॲक्टमधील महिला तसेच इतर महिला यांच्यामध्ये खटके उडत असतात. पिटा ॲक्ट अंतर्गत महिला गुन्हेगाराला या वसतिगृहात २१ दिवस ठेवले पाहिजे. येथील महिलांना न्यायालयीन सुनावणीसाठी न्यायालयात न्यावे लागते. त्याचप्रमाणे या महिलांच्या मार्गावर काही गुन्हेगारी स्वरूपाच्या व्यक्ती असतात व त्या व्यक्ती वसतिगृहात शिरण्याचा प्रयत्न करीत



असतात. महिलांची ने-आण करण्यासाठी तसेच व वसतिगृहातील सुरक्षिततेसाठी सुरक्षा कर्मचारी नियुक्त करावेत, अशा प्रकारची विनंती वसतिगृह व्यवस्थापनाने औरंगाबाद पोलीस आयुक्तांकडे केली होती. परंतु, पेड सर्व्हिस मिळेल, सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतन वसतिगृहाला द्यावे लागेल, असे सांगितल्यामुळे तशी व्यवस्था करता आली नाही. पुन्हा ही बाब पोलीस आयुक्त यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर विनामोबदला सुरक्षा कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव त्यांनी शासनाकडे पाठविला आहे. या वसतिगृहाला स्वतःची इमारत, सुरक्षा कर्मचारी, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे यांची आवश्यकता आहे.

पिटा ॲक्टअंतर्गत पकडलेल्या महिला कधी कधी एक-एक वर्ष डिटेंशनमध्ये असतात. त्यामुळे शासनाने या संदर्भात मा. न्यायालयात रिव्ह्यू पिटिशन दाखल करावे, असे मत आहे. अशा प्रकरणातील निकाल कमाल २१ दिवसांत लागला पाहिजे, असे काही तरी बंधन असले पाहिजे.

अन्य सर्व वसतिगृहांमध्ये महिला डॉक्टरांची नियुक्ती केलेली असते. परंतु, या वसतिगृहात तशी व्यवस्था नाही. त्यामुळे या वसतिगृहातील महिलांना आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत अन्य वसतिगृहातील डॉक्टरांना व्यक्तीशः विनंती केली आहे व त्याप्रमाणे ते मदत करीत आहेत. तथापि, वसतिगृह व्यवस्थापन त्यांना मानधन देऊ शकत नाही. त्यांना योग्य ते मानधन देण्याबाबत समितीने शासनाला शिफारस करावी, अशी त्यांनी समितीस विनंती केली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

सावित्रीबाई महिला वसतिगृह येथे दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सावित्रीबाई महिला वसतिगृह, औरंगाबाद ही इमारत भाडे तत्त्वावर सुरू आहे. सदर इमारतीच्या मालकाने भाडे वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला असून, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा केली.

विभागीय सचिवांनी या विषयाच्या संदर्भातील माहिती घेतलेली आहे. भाडेवाढीच्या संदर्भातील प्रस्तावास दिनांक २० सप्टेंबर २०१४ रोजी मान्यता देण्यात आली आहे. सद्यःस्थितीत भाडे दरमहा रुपये ४८ हजार ८०० घेतले जात आहे. तसेच राज्य शासनाची महिला बालविकास विभागांतर्गत शासकीय महिला वसतिगृह आणि संरक्षणगृहे २२ आहेत. अनुदानित स्वयंसेवी आधारगृह ९ आहेत. एनजीओमार्फत चालविले जाणारे विनाअनुदानित आधारगृह एक आहे. या व्यतिरिक्त केंद्र शासनाच्या ४८ योजना आहेत. या व्यतिरिक्त केंद्रपुरस्कृत समाजकल्याण बोर्ड आहे. केंद्रपुरस्कृत नोकरी करणाऱ्या महिलांसाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत नोकरी करणाऱ्या महिलांसाठी ११४ वसतिगृहे आहेत. केंद्र शासनाची निवासी उज्ज्वलागृहे १६ इतकी आहेत आणि अनिवासी उज्ज्वलागृहे २९ इतकी आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने पिटा कायद्यांतर्गत ज्या महिला आहेत, त्यांना निराधार महिलांसोबत ठेवले जाते, याऐवजी त्यांची स्वतंत्रपणे वेगळी व्यवस्था करावी. पिटा कायद्यांतर्गत संबंधित महिलांना डायरेक्ट जेलमध्ये टाकण्याची गरज आहे. भविष्यात पिटा कायद्यांतर्गत ज्या महिला असतील अशा महिलांसोबत निराधार महिलांना ठेवण्यात येऊ नये अशी सूचना केली.

विभागीय सचिवांनी पिटा कायद्यांतर्गत ज्या महिला असतील अशा महिलांसोबत निराधार महिलांना ठेवण्यात येणार नाही. समितीच्या सूचनेनुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल असे समितीस सांगितले.

समितीने या वसतिगृहाला शासनाने अथवा महानगरपालिकेने भूखंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केलेली आहे ? दरमहा रुपये ४८ हजार ८०० भाडे भरण्यापेक्षा शासनाच्या मालकीच्या जागेत वसतिगृह उभारले जावे असा प्रस्ताव विभागाने तयार केलेला आहे काय ? औरंगाबाद जिल्ह्यामध्ये महसूल विभागाच्या स्वतःच्या मालकीच्या अनेक जागा आहेत. त्यामुळे शासनाच्या मालकीच्या जागेत वसतिगृह उभारले जावे असा प्रस्ताव विभागाने तयार केलेला आहे काय ? औरंगाबाद जिल्हा परिषदेने महसूल विभागाकडे जागा मिळण्याबाबत मागणी करावी अशी सूचना केली.

विभागीय सचिवांनी सद्यःस्थितीत राज्य शासनाकडे अशा प्रकारचा प्रस्ताव आलेला नाही. प्रशासकीय व्यवस्थेबाबत औरंगाबाद जिल्हा परिषदेकडे अशी व्यवस्था नाही. पुण्यात आयुक्त, डब्लुसीडी आहेत आणि त्यांच्या अंतर्गत कनिष्ठ स्तरावर अधिकारी काम करीत असून, त्यांना योग्य त्या सूचना दिल्या जातील असे समितीस सांगितले.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद यांनी या विषयाच्या संदर्भात एक प्रस्ताव तयार करण्याची गरज आहे. त्यांनी जागेच्या संदर्भात सिडकोकडे मागणी करण्याची आवश्यकता आहे. अशी सूचना केली.

विभागीय सचिवांनी कमिशनर ऑफिसरमधील प्रतिनिधीकडे याबाबत प्रस्ताव पाठविला जाईल असे समितीस सांगितले.

समितीने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे काय ? सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याची गरज आहे. ज्या भागात महिलांसाठी वसतिगृह आहेत, अशा ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करायलाच हवी आणि हे बंधनकारक असले पाहिजे अशी सूचना केली.

विभागीय सचिवांनी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केलेली नाही. सीसीटीव्ही यंत्रणेच्या संदर्भात ओव्हर ऑल पॉलिसीच्या संदर्भात विभागाकडून योग्य ती कार्यवाही केली जात आहे. राज्यात ज्या ठिकाणी महिला वसतिगृहे आहेत, अशा ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी पॉलिसी डिसीजन घेतले जाईल. सीसीटीव्ही यंत्रणा बसविल्यानंतर त्याचे मॉनेटरिंग कोठे असावे यासंदर्भात विभागाकडून विचार केला जात आहे असे समितीस सांगितले.

समितीने पिटा कायद्यांतर्गत ज्या महिला आहेत, अशा ठिकाणी काय होत असेल महिला मनोरूग्ण देखील त्याच वसतिगृहात राहतात काय ? महिलांना वेगळ्या कक्षामध्ये ठेवले जाते की एकाच कक्षामध्ये ठेवले जाते ? अशी विचारणा केली.

विभागीय सचिवांनी ही स्कीम तशाच प्रकारची आहे. महिलांसाठी एकच कक्ष आहे. पण त्यामध्ये मनोरुग्णांना वेगळे ठेवले जात नाही. विभागाकडे तशा प्रकारचे वेगळे इन्फ्रास्ट्रक्चर नाही. यामधील अनेक योजना या राज्य शासनाच्या नसून, त्या केंद्र शासनाच्या आहेत असे समितीस सांगितले.



समितीने सीसीटीव्ही यंत्रणा बसविल्यानंतर त्याच्या मॉनेटरिंगची व्यवस्था ही स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये असावी अशी समितीची सूचना आहे. यावर गृह विभागाचे नियंत्रण असणार आहे. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाची जी महिला वसतिगृहे आहेत, अशा ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वितकरून त्याच्या देखभालीची व्यवस्था ही स्थानिक पोलीस स्टेशनने करणे अभिप्रेत आहे. अशी सूचना केली.

विभागीय सचिवांनी महिला वसतिगृहात सीसीटीव्ही यंत्राणा कार्यान्वित करून त्याच्या देखभालीची व्यवस्था करण्यात येईल असे समितीस सांगितले.

समितीने यापूर्वी एका वसतिगृहाला भेट दिली असता, त्या ठिकाणी आरोग्यविषयक अनेक तक्रारी समितीच्या निदर्शनास आलेल्या होत्या. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या मार्फत महिलांच्या आरोग्याची वेळोवेळी तपासणी करणे गरजेचे आहे. महिलांच्या आरोग्याची तपासणी महिन्यातून एकदा तरी करण्याची आवश्यकता आहे अशी सूचना केली.

विभागीय सचिवांनी प्रत्येक महिला वसतिगृहासाठी वेगळा आरोग्य अधिकारी दिलेला नाही. पण महिला व बालकल्याण विभागाने अशा ठिकाणी डॉक्टरांकडून वेळोवेळी तपासणी करण्याची व्यवस्था केलेली आहे. गायनॉकॉलिजीस्ट महिला डॉक्टर असून, त्या अशा वसतिगृहांना नियमितपणे भेटी देत आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जास्तीत जास्त महिलांची आरोग्य तपासणी करावी अशा सूचना दिल्या जातील असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने सावित्रीबाई महिला वसतिगृह, औरंगाबाद येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने सदर वसतिगृह भाड्याच्या इमारतीत असून त्यासाठी प्रति माह रक्कम रुपये २०,७०० एवढे भाडे अदा करावे लागते. त्याचप्रमाणे वीज व पाणी यांसाठी अतिरिक्त रक्कम रुपये १०,००० एवढा खर्च येत असतो. वसतिगृह व्यवस्थापनाकडे बाजारभावाप्रमाणे औरंगाबाद शहरात जमीन विकत घेण्याएवढी आर्थिक कुवत नसल्यामुळे महानगरपालिका किंवा जिल्हाधिकारी यांनी वसतिगृहासाठी जमीन उपलब्ध करून दिल्यास या संस्थेची इमारत उभी राहू शकेल व दरमहा रुपये ५० हजारांचा खर्च वाचून तो पैसा गरजू, अभागी महिलांवर खर्च करता येऊ शकेल. त्याचप्रमाणे शासनाने या वसतिगृहासाठी स्वतःची इमारत बांधण्यासाठी जिल्हा महिला व बाल कल्याण विभागाने शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिकेकडे वसतिगृहाच्या इमारतीसाठी १० हजार चौरस फूटाचा भूखंड उपलब्ध करून द्यावा अशी मागणीही करण्यात आली आहे. बाजारभावाप्रमाणे औरंगाबाद शहरात जमीन विकत घेण्याऐवढी कुवत वसतिगृह व्यवस्थापनाकडे नाही. सदरचे वसतिगृह हे महिलांचे विशेषतः पिडित महिलांचे आहे. या वसतिगृहात पिडित महिला, कुमारी माता, वेश्या व्यवसायातून सोडवणूक करण्यात आलेल्या महिला, निराधार महिला, मनोरुग्ण महिला,

मुकबधीर मुली इत्यादींना सामावून घेण्यात येते. तसेच पिटा कायद्यांतर्गत ज्या महिला आहेत, त्यांना निराधार महिलांसोबत ठेवले जाते, याऐवजी त्यांची स्वतंत्रपणे वेगळी व्यवस्था करावी. पिटा कायद्यांतर्गत संबंधित महिलांना डायरेक्ट जेलमध्ये टाकण्याची गरज आहे. भविष्यात पिटा कायद्यांतर्गत ज्या महिला असतील अशा महिलांसोबत निराधार महिलांना ठेवण्यात येऊ नये या वसतिगृहात पिटा अंतर्गत कायद्याने अटक केलेल्या महिला सर्वसाधारणपणे गुन्हेगार स्वरूपाच्या असतात, त्यांना उपरोक्त नमूद केलेल्या निराधार व अत्याचारित महिलांबरोबर न ठेवता त्यांची राहण्याची वेगळी व्यवस्था करणे आवश्यक आहे. या महिलांच्या मागावर गुन्हेगारी स्वरूपाच्या व्यक्ती असल्यामुळे अशा गुन्हेगारी व्यक्तींची वसतिगृहात शिरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या गुन्हेगारी व्यक्तींचा वसतिगृहातील इतर महिलांनादेखील त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या महिलांची अनेक वेळा मा. न्यायालयात ने-आण करावी लागते. त्यावेळी त्यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा कर्मचारी नियुक्त करण्याबाबत पोलीस आयुक्तांना कळविले असता त्यांनी सांगितले की, या कामासाठी शुल्क आकारून तशी सेवा देण्यात येईल. सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतन वसतिगृह व्यवस्थापनाला द्यावे लागेल यावर व्यवस्थापनाने वसतिगृह व्यवस्थापनाची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक असून सुरक्षा रक्षक नेमण्याची व्यवस्था व्यवस्थापनास करता येणार नाही असे निदर्शनास आणून दिल्यानंतर पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी या महिलांना विना मोबदला सुरक्षा व्यवस्था पुरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. या वसतिगृहाला स्वतःची इमारत नसणे, महिलांना सुरक्षा रक्षक नसणे, सीसीटीव्ही कॅमेरा नसणे, तसेच तज्ज्ञ स्त्री वैद्यकीय अधिकाऱ्याची उपलब्धता नसणे, तसेच वर्षानुवर्षे पिटा कायद्यांतर्गत अटक करण्यात आलेल्या महिला कैदेत राहत असल्यामुळे त्यावर शासनाने मा.न्यायालयात पुर्नविलोकन याचिका दाखल करण्याची आवश्यकता इत्यादी बाबी वसतिगृहाच्या व्यवस्थापनाने समितीच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत.

समितीला प्राप्त झालेली माहिती विचारात घेता या वसतिगृहात अत्याचारित पिडित, मनोविकारग्रस्त, मुकबधिर, निराधार, कुमारी माता, वेश्या व्यवसायातून मुक्त करण्यात आलेल्या महिला इत्यादींना ठेवले जाते. भारतीय संविधानातील राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वात नमूद केल्यानुसार तसेच शासनाच्या धोरणानुसार वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पिडित अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे. अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसाह्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करण्याची तरतूद नमूद आहे. त्यानुसार शासनाने धोरण निश्चित केले असून अत्याचारपिडित महिला, मनोरुग्ण महिला, कुमारी माता, वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला इत्यादीसाठी महिला वसतिगृहे स्थापित केली आहेत. या वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या सर्व पिडित महिलांची यथायोग्य दखल घेणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यासाठी या महिलांना देण्यात येत



असलेल्या सोयी-सुविधांची योग्यरितीने अंमलबजावणी होते किंवा कसे याची देखरेख करून त्यासाठी पर्याप्त निधी मंजूर करण्याची बाबदेखील शासनाच्या अखत्यारितील आहे. वसतिगृहाचे व्यवस्थापन सदरचे वसतिगृह हे भाड्याचे इमारतीमध्ये राहत असून सदरचे भाडे व्यवस्थापनाद्वारे देण्यात येत आहे. आता इमारत मालक वाढीव भाडे आकारत असून त्याची प्रतिपूर्ती करणे व्यवस्थापनास अवघड जात असल्याने व्यवस्थापनाने जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिकेकडे आवश्यक असलेल्या भूखंडाची मागणी केली आहे. त्याचप्रमाणे महिला व बालविकास विभागानेदेखील शासनाकडे या संस्थेच्या इमारतीसाठी भूखंड रास्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी मागणी केली आहे. सदरची मागणी रास्त आहे असे समितीचे मत आहे. **उपरोक्त नमूद केलेल्या पिडित महिलांना अन्न, वस्त्र व निवारा इत्यादी देण्याची बाब हे शासनाचे कर्तव्य असून त्या बाबीची पूर्तता एक अशासकीय संस्था म्हणून सदरचे वसतिगृह व्यवस्थापन पार पाडत आहे. अशा सेवाभावी संस्थेला शासनाने भूखंड देणे समितीला इष्ट वाटते. यास्तव औरंगाबाद शहरात उपलब्ध असलेली या व्यवस्थापनाने मागणी केलेली कोणतीही शासकीय जागा अथवा भूखंड शासनाने विनाविलंब रास्त दरात मंजूर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**या वसतिगृहात पिटा कायद्यांतर्गत अनेक महिला कैद्यांना ठेवले जाते. ज्याचा प्रभाव इतर पिडित, मनोरुग्ण, मुकबधिर, कुमारी माता इत्यादी महिलांवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या महिला गुन्हेगारी स्वरूपाच्या असल्यामुळे त्यांच्या मागावर गुन्हेगारी स्वरूपाच्या व्यक्ती असतात व त्या उपरोक्त नमूद केलेल्या निवासी महिलांच्या वसतिगृहात चोरून घुसण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी या इमारतीला सीसीटीव्हीची व्यवस्था तसेच उपरोक्त नमूद केलेल्या महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनाच्या गृह विभागाकडे सादर केलेला विना मोबदला सुरक्षा व्यवस्था पुरविण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागाने तातडीने मंजूर करून उक्त वसतिगृहास सुरक्षा व्यवस्था पुरविण्याबाबत आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

**तसेच पिटा कायद्यांतर्गत अटक करण्यात आलेल्या महिला या अन्य पिडित महिलांना त्रासदायक असल्याने त्यांची राहण्याची वेगळी व्यवस्था करण्यात यावी तसेच या महिलांवरील खटले वर्षानुवर्षे निकाली निघत नसल्यामुळे त्यांना कैदेत राहावे लागत असल्याने त्यांच्या सुटकेसाठी विहित कालावधीची तरतूद संबंधित अधिनियमात करून तशी सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करावी अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**उपरोक्त केलेल्या शिफारशीसंदर्भातील कार्यवाही तीन महिन्यांत करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत करण्यात यावी.**

## २. औरंगाबाद, महानगरपालिका

**२.१ औरंगाबाद महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :-**

औरंगाबाद, महानगरपालिका येथे दिनांक ११ जुलै २०१४ रोजी समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्रश्नावलीच्या अनुषंगाने माहिती मागविण्यात आली होती.

औरंगाबाद, महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ अधिकारी व कर्मचारी यांची पदसंख्या किती आहे ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबिण्यात येते ? महिला उमेदवारासाठी ३० टक्के राखीव ठेवण्यात आलेल्या पदांपैकी किती पदे रिक्त आहेत ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी औरंगाबाद महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

औरंगाबाद, महानगरपालिकेच्या सेवेत वर्ग १ मध्ये तांत्रिक अधिकाऱ्यांची ७ पदे मंजूर असून ६ पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच वर्ग १ मधील अतांत्रिक अधिकाऱ्यांची ६ पदे मंजूर असून ४ पदे भरण्यात आलेली आहेत. वर्ग २ मध्ये तांत्रिक अधिकाऱ्यांची ५५ पदे मंजूर असून ४५ पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच वर्ग २ मधील अतांत्रिक अधिकाऱ्यांची २२ पदे मंजूर असून ४ पदे भरण्यात आलेली आहेत. महानगरपालिकेमध्ये वर्ग १ ते ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांची एकूण संख्या ४,३४४ असून १,४०४ महिला अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी २१ महिला अधिकारी असून १,३८३ महिला कर्मचारी कार्यरत आहेत. महापालिकेकडे स्वतंत्र सेवा नियम दिनांक १६ मे १९९४ पासून अस्तित्वात असून महाराष्ट्र महानगरपालिका सेवा नियम, २००७ मध्ये सुधारणा करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले आहेत. महिला उमेदवारांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. सर्व संवर्गाची एकत्रित नोंद वही ठेवण्यात आलेली आहे अशी माहिती प्राप्त झाली.

**औरंगाबाद महानगरपालिकेच्या आयुक्तांची साक्ष :-**

औरंगाबाद महानगरपालिकेला दिनांक ११ जुलै २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्तांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजमितीस महानगरपालिकेच्या सेवेत अधिकारी व कर्मचारी किती आहेत, त्यापैकी महिला कर्मचारी/अधिकाऱ्यांची संख्या किती आहे ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महानगरपालिकेत सेवेत वर्ग-१ व वर्ग-२ च्या संवर्गात एकूण ७० अधिकारी असून त्यापैकी २२ महिला अधिकारी आहेत. वर्ग-३ व वर्ग-४ च्या संवर्गात ४,१८३ कर्मचारी असून त्यापैकी १,३५१ महिला कर्मचारी आहेत. एकूण कार्यरत महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या ३२.८ टक्के आहे. असे समितीस सांगितले.

समितीने कार्यकारी अभियंता संवर्गात १ पद रिक्त ठेवण्याचे कारण काय ? तसेच वर्ग ३ (तांत्रिक) महिला कनिष्ठ अंभियंत्याची १० पदे रिक्त आहेत. या पदावर महिला येण्यास तयार होत नाही काय ? अशी विचारणा केली.



आयुक्तांनी कार्यकारी अभियंता संवर्गातील पद बढतीचे असून अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे सदर पद रिक्त आहे. या पदाच्या संदर्भात सन २०११ मध्ये जाहिरात देण्यात आली होती परंतु न्यायालयीन प्रक्रियेमुळे सर्व प्रक्रिया रद्द करावी लागली होती. आता या पदाची जाहिरात दिली जाणार आहे. असे समितीस सांगितले.

समितीने शारीरिक शिक्षक या संवर्गातील पदांबाबतची माहिती दिली आहे. याबाबत समितीच्या वतीने महानगरपालिकेला एक सूचना करावयाची आहे. शारीरिक शिक्षक या संवर्गात महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात आले आहे. परंतु, सर्वच पदांवर फक्त महिला शिक्षक घेतल्या तरी कोणाची हरकत असणार नाही. याचे कारण असे आहे की, अनेक शाळांमध्ये पुरूष शारीरिक शिक्षकांबाबत विद्यार्थीनींची तक्रार असते. विद्यार्थीनींची तक्रार राहू नये व त्यांना सुरक्षितपणे शारीरिक शिक्षण मिळावे, यासाठी या पदावर महिला शिक्षकांची नियुक्ती करण्याला त्या त्या आस्थापनांनी प्राधान्य दिले पाहिजे व तसे प्राधान्य औरंगाबाद महानगरपालिकेने द्यावे अशी सूचना केली असता आयुक्तांनी सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय रास्त आहे. पुस्तिकेमध्ये दर्शविण्यात आलेले आरक्षण हे नियमानुसार किमान आरक्षण आहे. त्यापेक्षा जास्त प्रमाणावर महिला शिक्षिका उपलब्ध झाल्या तर निश्चितपणे त्यांना प्राधान्य देऊ व तसा प्रयत्न करू असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये संध्याकाळी ओ.पी.डी. सुरू करण्याबाबत अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. परंतु, अद्याप याबाबत महानगरपालिकेने कार्यवाही केलेली नाही अशी विचारणा केली.

आयुक्तांनी आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबतची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शासनाकडून ओएनएम व डॉक्टरांची पदे भरली जातात. १५ दिवसांपूर्वीच या पदांची भरती प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्यामुळे आता आवश्यक तो कर्मचारी मिळणार आहे असे समितीस सांगितले.

समितीने वाहन/रिक्षा/जेसीबी चालक या संवर्गात महिलांसाठी आरक्षित असलेली सर्वच्या सर्व २८ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबत महानगरपालिकेने कोणते प्रयत्न केले आहेत ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महिला उमेदवार उपलब्ध होत नाहीत. परंतु, याबाबत प्रयत्न केले जातील असे समितीस सांगितले.

समितीने महिलांसाठी आरक्षित असलेली पदे तातडीने भरण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. निवड समितीमध्ये कोणत्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी निवड समितीमध्ये उप आयुक्त (प्रशासन), उप आयुक्त (महसूल), आस्थापना अधिकारी, चिफ ऑडिटर, मागासवर्गीय अधिकारी, अल्पसंख्याक समाजातील एक अधिकारी यांचा समावेश आहे असे समितीस सांगितले.

समितीने महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या संदर्भात स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आली आहे काय ? असल्यास केव्हापासून ? नोंदवही अधयावत स्वरूपातआहे काय ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महिला उमेदवारांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नाही. सर्व संवर्गांची एकत्रित नोंदवही ठेवण्यात आली आहे. परंतु यापुढे महिलांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्याचा प्रयत्न करू असे समितीस सांगितले.

समितीने महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांचा अहवाल सचिव, महिला व बालविकास विभाग तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांना पाठविलेला दिसत नाही. अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांचा अहवाल स्वतंत्रपणे पाठविला जात नाही, परंतु याबाबतचा अहवाल यापुढे पाठविण्यात येईल असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

औरंगाबाद महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने शासन निर्णयानुसार महिलांकरिता ३० टक्के आरक्षण असल्याबाबत सेवाविषय नियम तयार करून त्याद्वारे भरती, पदोन्नती देण्याचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे काय, त्याची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा केली असता आयुक्तांनी महानगरपालिकेचा आकृतिबंध तयार करून शासनाला सादर केलेला आहे असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयानुसार सेवाभरतीमध्ये ३० टक्के महिलांची आरक्षित पदे भरली आहेत का? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी मुख्य अग्निशमन अधिकारी आरक्षित पदे शून्य असून भरलेली पदे शून्य आहेत. वैद्यकीय अधिकारी ३१ पदे मंजूर असून भरलेली पदे २१ आहेत आणि ९ आरक्षित पदे भरली आहेत. त्यांपैकी १७ पदे महिलांची आहेत. आरोग्य विभागामध्ये महिलांची पदे भरण्यासंदर्भात कसलीही अडचण नाही असे समितीस सांगितले.

समितीने तांत्रिक पदांमध्ये कनिष्ठ अभियंता, आरक्षित पदे आहेत आणि भरलेली पदे शून्य आहेत. ती पदे केव्हापासून रिक्त आहेत? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी आता जाहिरात देऊन कार्यवाही करीत आहोत. गत दोन वर्षांमध्ये कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यामुळे सदरची पदे रिक्त झालेली आहेत असे समितीस सांगितले.

समितीने महिलांच्या दहा जागा रिक्त आहेत. आज कितीतरी बेरोजगार महिला बाहेर आहेत. या पदांसाठी जाहिरात दिली नाही काय ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी आकृतिबंध तयार केला असून तो शासनास सादर केलेला आहे. महानगरपालिकेचा प्रशासकीय खर्च ४४ टक्के आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तो ३४ टक्के ठेवावा लागतो, परंतु महानगरपालिकेचा ४४ टक्के खर्च आहे. तसेच महानगरपालिकेला खर्चाला मर्यादा आहे असे समितीस सांगितले.



समितीने महिलांची १० पदे रिक्त असतील तर कमीत कमी २ पदे भरली पाहिजेत. भरलेली पदे शून्य दाखवित आहात, याचा अर्थ एकही महिला या पदासाठी पात्र नाही काय ? महिलांवर अन्याय होत आहे असे वाटत नाही काय ? आतापर्यंत हा अहवाल का पाठविला नाही? ९४ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासंदर्भात शासनाकडे किती वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. रिक्त पदे भरण्यासंदर्भात मागणी केली आहे काय ? आढावा बैठकीत हा विषय घेत नाहीत काय ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी आतापर्यंत जाहिरात दिलेली नाही ती आता देऊ. जाहिरात पब्लिसिटीकडे देतो. लोकमत तसेच लिडिंग वर्तमानपत्रामध्ये देतो. आतापर्यंत जी भरती प्रक्रिया झालेली आहे त्यामध्ये महिलांची टक्केवारी मेन्टेन झालेली नाही, परंतु आता ती यापुढे मेन्टेन करण्यात येईल. आढावा बैठकीत खर्चाचा आढावा घेण्यात येतो. महानगरपालिकेचा खर्च जास्त झालेला असल्यामुळे रिक्त पदे भरण्यासंदर्भात मागणी केलेली नाही असे समितीस सांगितले.

समितीने वर्ग ३ मध्ये एकूण पदे ४४७ असून त्यामध्ये रिक्त पदे ९६ आहेत ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महिला आरक्षणानुसार ९६ पदे येतात. तसेच या महानगरपालिकेचा खर्च जास्त असल्यामुळे पदे भरण्याची बाब अनुज्ञेय नसली तरी महिला राखीव पदे भरण्याची परवानगी देता येईल काय, ही बाब तपासून घेता जर देता येणे शक्य असेल तर तशी परवानगी दिली जाईल. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे यापुढे अहवाल पाठविण्यात येईल. तसेच विभागीय सचिवांनी संबंधित महानगरपालिकेने जर मागणी केली तर त्यांची जागा भरण्यासाठी अपरिहार्यता लक्षात घेऊन शासन मान्यता देते. त्यांचे खर्च ३५ टक्केच्या वर असला तरी जेथे पद भरण्याची नितांत आवश्यकता आहे तेथे शासनाकडून परवानगी दिली जाते. औरंगाबाद महानगरपालिकेला आकृतिबंध निश्चित करून द्यायला सांगितलेला आहे. सर्वच महानगरपालिकांना आकृतिबंध शासनास सादर करण्यास सांगितले आहे. ही बाब कार्यवाहीमध्ये आहे असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने औरंगाबाद महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने महानगरपालिकेत सेवेत वर्ग १ व वर्ग-२ च्या संवर्गात एकूण ७० अधिकारी असून त्यापैकी २२ महिला अधिकारी आहेत. वर्ग ३ व वर्ग ४ च्या संवर्गात ४,१८३ कर्मचारी असून त्यापैकी १,३५१ महिला कर्मचारी आहेत. एकूण कार्यरत महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या ३२.८ टक्के आहे. महिला उमेदवारांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नाही. सर्व संवर्गाची एकत्रित नोंदवही ठेवण्यात आली आहे. परंतु यापुढे महिलांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्याचा प्रयत्न करून महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांचा अहवाल विभागास स्वतंत्रपणे पाठविला जाईल. शारीरिक शिक्षक या संवर्गात महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात आले आहे. परंतु, सर्वच पदांवर फक्त महिला शिक्षक घेतल्या तरी कोणाची हरकत असणार नाही. अनेक शाळांमध्ये पुरूष शारीरिक शिक्षकांबाबत विद्यार्थीनींची तक्रार असते. त्यांना सुरक्षितपणे शारीरिक शिक्षण मिळावे, यासाठी या पदावर महिला शिक्षकांची नियुक्ती करण्याला त्या त्या आस्थापनांनी प्राधान्य दिले पाहिजे. गत दोन वर्षांमध्ये कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे मुख्य अग्निशमन अधिकारी आरक्षित पदे रिक्त

झालेली आहेत त्याचप्रमाणे निवड समितीमध्ये उपायुक्त (प्रशासन), उपायुक्त (महसूल), आस्थापना अधिकारी, चिफ ऑडिटर, मागासवर्गीय अधिकारी, अल्पसंख्यांक समाजातील एक अधिकारी इत्यादींचा समावेश आहे. वाहन/रिक्षा/ जेसीबी चालक इत्यादी संवर्गात महिलांसांठी आरक्षित असलेली सर्वच्या सर्व २८ पदे रिक्त असून या पदासाठी महिला उमेदवार उपलब्ध होत नाहीत. सदरच्या जागा भरण्यासाठी प्रयत्न केले जातील असे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी समितीस विदित केले.

उपरोक्त माहिती विचारात घेता औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये महिलांची अनेक पदे रिक्त असून ती भरण्यासंदर्भात महानगरपालिकेच्या आयुक्तांनी समितीला आश्वासीत केले आहे. त्याचप्रमाणे महिला उमेदवारांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नाही. सदरहूची नोंदवही अद्ययावत ठेऊन महिला उमेदवाराच्या सर्व संवर्गाच्या एकूण रिक्त जागांची स्वतंत्र नोंदवही यापुढे ठेवण्यात येईल त्याचप्रमाणे महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांचा अहवाल स्वतंत्रपणे विभागाला पाठविण्यात येईल असेही समितीला आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी आश्वासीत केले आहे. **उपरोक्त आश्वासीत केल्याप्रमाणे यापुढील काळात कोणत्याही परिस्थितीमध्ये महिलांकरिता राखीव असलेल्या ३० टक्के जागा भरण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. रिक्त पदांची संवर्गनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी तसेच रिक्त पदांची माहिती नगरविकास विभागाला वेळोवेळी पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.२ महिलांवरील होणाऱ्या अन्यायाबाबत तसेच तक्रार निवारण कक्ष :-**

गत तीन वर्षात महिला अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून त्यांचेवर होत असलेल्या अन्यायासंदर्भात (लैगिंक छळ, मानसिक त्रास, इ.) निवेदने प्राप्त झाली आहेत काय ? त्या संदर्भात पुढे काय कार्यवाही करण्यात आली ? महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष सुरू करण्यात आला आहे काय ? त्यामध्ये महिला व बालकल्याण अधिकारी हे पद आहे काय ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी औरंगाबाद, महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

सन २००४ मध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष सुरू करण्यात आला आहे. मागील तीन वर्षातील तक्रारींची संख्या खालीलप्रमाणे :—

सन २००८-२००९ - ००

सन २००९-२०१० - ००

सन २०१०-२०११ - ०४

या तक्रारीचे निवारण समिती सदस्यांच्या बैठकीत संबंधिताची व तक्रारदाराची चौकशी करून करण्यात आले. तक्रार निवारण समितीमध्ये खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे :—

अध्यक्ष व सचिव - २ वैद्यकीय अधिकारी

अध्यक्ष व सचिव - २ वैद्यकीय अधिकारी



सदस्य - आस्थापना अधिकारी

शिक्षणाधिकारी

जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी

३ महिला कर्मचारी

१ स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी

सन २०१०-११ या वर्षात ४ तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. तक्रार निवारण समिती समोर तक्रारदार व ज्यांच्याबाबत तक्रार आहे त्यांना समक्ष बोलावून उचित कारवाई करण्यात आली.

तक्रार निवारण समितीमध्ये अध्यक्ष व सचिव म्हणून २ वैद्यकिय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. अशी माहिती प्राप्त झाली.

**औरंगाबाद, महानगरपालिकेच्या आयुक्तांची साक्ष :-**

औरंगाबाद महानगरपालिकेला दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्तांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने ज्या महिलांनी ज्यांच्या विरोधात तक्रार केली आहे अशांना केवळ समज देण्यात आली आहे, सक्त ताकीद देण्यात आली आहे, समज देऊन महिलेची बदली रद्द करण्यात आली आहे अशा प्रकारची कारवाई करण्यात आलेली आहे. महिला तक्रार निवारण समितीमध्ये कोणा कोणाचा समावेश आहे ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महिला तक्रार निवारण समितीमध्ये अध्यक्ष आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी असून सदस्य सचिव वैद्यकीय अधिकारी तथा कक्ष प्रमुख व बाल कल्याण समिती, सदस्य आस्थापना अधिकारी-१, शिक्षण विभागातील शिक्षिका प्रतिनिधी, मनपातील महिला कर्मचाऱ्यांपैकी २ प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, विधी सल्लागार/विधी शाखेच्या प्राध्यापिका यांचा समावेश महिला तक्रार निवारण समितीमध्ये आहे असे समितीस सांगितले.

समितीने पहिल्या प्रकरणात वॉर्ड अधिकाऱ्याला समज देण्यात आली म्हणजे नक्की काय ? अशी विचारणा केली.

महिला तक्रार निवारण प्रमुखांनी सदर प्रकरण हे सन २०१० मधील असून सदरहू महिलेची गैरसोईच्या वॉर्डात बदली केल्यासंदर्भात तक्रार होती. या प्रकरणामध्ये दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले होते. या प्रकरणात श्रीमती नेहरी यांची त्यांच्या पहिल्या जागेवर बदली करण्यात आली असून संबंधित वॉर्ड अधिकारी श्री. लाड यांना वर्तणूकीबाबत समज देण्यात आली आहे असे समितीस सांगितले.

समितीने पुरुष अधिकाऱ्याने महिला कर्मचाऱ्यास मुद्दाम त्रास दिला असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई झाली पाहिजे. हे प्रकरण पुन्हा सुरू करून नव्याने चौकशी करण्यात यावी. खरे म्हणजे अशा कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करण्याची आवश्यकता आहे. अशी सूचना केली.

आयुक्तांनी या प्रकरणाची नव्याने चौकशी करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांच्या तक्रारीची गंभीरपणे दखल घेण्याची आवश्यकता आहे. महिला कर्मचाऱ्यांच्या बैठका वारंवार घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता असते. तसेच आज श्रीमती सकिना रफिक शेख यांनी मुख्याध्यापकाच्या संदर्भात तक्रार केलेली आहे. अशी सूचना केली.

आयुक्तांनी या प्रकरणातील मुख्याध्यापकांचे निलंबन करण्यात आलेले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने श्री. साताळकर यांच्या संदर्भातील प्रकरण काय आहे? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महिला तक्रार निवारण प्रमुखांनी सदर प्रकरणात आरोग्य कर्मचाऱ्याच्या विरोधात तक्रार होती. दूरच्या ठिकाणी बदली केल्यामुळे सदर तक्रार करण्यात आली होती. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले असून, जाबजबाबही घेण्यात आले आहेत. आता त्रास होत नाही असे तक्रारकर्त्या महिलेने सांगितलेले आहे. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून साताळकर यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने रात्रीच्या वेळी जे कर्मचारी अशा प्रकारे फोन करतात त्यांची खरे म्हणजे रक्त तपासणी करून घेतली पाहिजे. महिलांची तक्रार आल्यानंतर त्यासंदर्भात ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे. उशीर झाला तर महिलांना न्याय मिळू शकत नाही. आयपीसीच्या प्रकरणात विशिष्ट स्तरावर निर्णय घेण्याची आवश्यकता असते. विधी अधिकाऱ्यांनी सर्व प्रकरणाची माहिती देणे फार आवश्यक असते. मा.न्यायालयात अशी प्रकरणे गेली तर त्याचा फायदा होतो. तक्रार आल्यानंतर किती दिवसात चौकशी केली जाते ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महिला तक्रार निवारण प्रमुखांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर बैठकीत त्याचे वाचन केले जाते. तक्रारदाराचे म्हणणे ऐकले जाते तसेच ज्यांच्याविरुद्ध तक्रार आहे त्यांचेही म्हणणे ऐकले जाते, संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवले जातात. तक्रारीमध्ये तथ्य असेल तर दोन तीन महिन्यात तक्रारीचा निपटारा केला जातो. तक्रारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा उशीर केला जात नाही. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेने तक्रार निवारण कक्ष सुरू केला असला तरी या कक्षाकडे सन २००८-२००९, सन २००९-२०१० मध्ये एकही तक्रार प्राप्त झाली नाही व सन २०१०-२०११ मध्ये केवळ ४ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, असे दिलेल्या माहितीवरून लक्षात येते. परंतु, सदर माहिती योग्य वाटत नाही. कारण, एनसीआरबीच्या अहवालानुसार महिलांवरील अत्याचारात व गुन्ह्यात ३० टक्के वाढ झालेली आहे. अशी सूचना केली.

आयुक्तांनी सदरचा तक्रार निवारण कक्ष फक्त महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांसाठी आहे. हा सर्वसाधारण तक्रार निवारण कक्ष नाही. त्यामुळे महानगरपालिकेतील महिला कर्मचारीच या तक्रार निवारण कक्षाकडे तक्रारी करीत असतात. असे समितीस सांगितले.



**विभागीय सचिवांची साक्ष :-**

औरंगाबाद महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने शासनाच्या वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांना दालनाच्या सुविधा असतात. बऱ्याच वेळेला महिला अधिकाऱ्यांना कामानिमित्ताने त्यांच्या दालनात जावे लागते त्यावेळी अधिकाऱ्यांकडून त्यांची लैंगिक अहवेलना होत असते. अशा प्रकारची बाब टाळण्यासाठी अधिकाऱ्यांची दालने पारदर्शक असल्याबद्दल शासनाची काय भूमिका आहे? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी अधिकाऱ्यांच्या दालनांना काचा लावलेल्या आहेत, त्यामुळे अधिकाऱ्यांकडे कोण बसलेले आहे ते दिसते. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने औरंगाबाद महानगरपालिका येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीला सन २००८ ते २०११ या कालावधीत एकूण चार तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारी संदर्भात तक्रारदार व ज्यांच्याबाबत तक्रार आहे त्यांना तक्रार निवारण समितीसमोर समक्ष बोलावून उचित कारवाई करण्यात आली. पहिल्या प्रकरणात वॉर्ड अधिकाऱ्याला समज देण्यात आली असून संबंधित वॉर्ड अधिकारी श्री. लाड यांना वर्तणूकीबाबत समज देण्यात आली आहे. आरोग्य कर्मचाऱ्याच्या विरोधात तक्रार होती. आता त्रास होत नाही असे तक्रारकर्त्या महिलेने सांगितलेले आहे. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशीकरून साताळकर यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. शासनाच्या वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांच्या दालनांना काचा लावलेल्या आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांकडे कोण बसलेले आहे ते दिसते तसेच तक्रार निवारण प्रमुखांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर बैठकीत तक्रारींचे वाचन केले जाते, तक्रारदाराचे म्हणणे ऐकले जाते तसेच ज्यांच्याविरुद्ध तक्रार आहे त्यांचेही म्हणणे ऐकले जाते, संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविले जातात. तक्रारीमध्ये तथ्य असेल तर २-३ महिन्यात तक्रारींचा निपटारा केला जातो. तक्रारींच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा उशीर केला जात नाही तसेच सदरचा तक्रार निवारण कक्ष फक्त महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठीच आहे असे आयुक्त, महानगरपालिका यांनी समितीस विदित केले.

**उपरोक्त माहिती विचारात घेता आयुक्त, महानगरपालिका यांनी लैंगिक सतावणुकीने पिडित असलेल्या महिलेबाबतची तक्रार ज्या पद्धतीने निकाली काढली जाते. त्याबाबत समिती या महानगरपालिकेचे अभिनंदन करते. अशा प्रकारे तक्रारी निकाली काढण्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक संदेश जातो. महिला व पुरुषांमध्ये समानतेच्या वागणुकीची जाणीव होते. त्याचबरोबरीने महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोनदेखील बदलला जातो. तक्रार निवारण समिती ज्या पद्धतीने तक्रार निकाली काढते ती पद्धत निश्चितच प्रशंसनीय आहे. तद्वतच भविष्यात महिला व पुरुष अधिकारी/कर्मचाऱ्यांमध्ये महिलांच्या सतावणुकीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे विशाखा व इतर विरुद्ध राजस्थान सरकार व इतर या प्रकरणात दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक सूचना तसेच शासनाने या संदर्भात निर्गमित केलेल्या वेगवेगळ्या शासन निर्णयासंदर्भात कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्मितीसाठी योग्य ती उपाययोजना करण्यासंदर्भात महानगरपालिकेने प्रयत्न करावेत अशी समितीची शिफारस आहे.**

**२.३ औरंगाबाद, महानगरपालिकेचे अंदाजपत्रक व महिलांसाठी कल्याणकारी योजना :-**

महानगरपालिकेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय वार्षिक अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? उत्पन्नाच्या ५टक्के रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी खर्च करण्यात आली आहे काय ? महिलांसाठी कोणत्या कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जातात ? नगरपालिका क्षेत्रात किती रुग्णालये आहेत ? त्यात पोलियोचे रुग्ण आढळून आले आहेत काय ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी औरंगाबाद, महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

**नगरपालिकेचे अदांजपत्रक (संख्या हजारात)**

| सन | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|
| २००८-०९ | ३८,५९,३८५/- |
| २००९-१० | ५६,०४,६३५/- |
| २०१०-११ | ४१,८८,८२०/- |

महिला बालकल्याण विभागासाठी गत ३ वर्षात खलीलप्रमाणे आर्थिक तरतूद करण्यात आलेली होती :—

**(संख्या हजारात)**

| सन | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|
| २००८-०९ | १०,०००/- |
| २००९-१० | १०,०००/- |
| २०१०-११ | १०,०००/- |

महिला अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी वेगळया स्वरूपाच्या कल्याणकारी योजना राबाविल्या जात नाहीत. तथापि, जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात येतो. व्याख्यानाचे आयोजन केले जाते. सफाईचे काम करणाऱ्या महिलांची आरोग्य तपासणी केली जाते.

औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये ५ रूग्णालये व २२ आरोग्य केंद्रे यांच्यामार्फत महिलांच्या आरोग्याबाबत खालील योजना राबाविण्यात येतात :—

१. गरोदर मातांची नोंदणी
२. प्रसूतीपूर्व, प्रसूतीपश्चात सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा
३. प्रयोगशाळामार्फत सर्व प्रकारच्या लॅब संदर्भात चाचण्या
४. स्त्री कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया
५. कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत सर्व प्रकारच्या सेवा
६. बेबी फ्रेंडली हॉस्पीटल म्हणून मनपाच्या ५ रूग्णालयाची निवड



७. जननी सुरक्षा योजना संदर्भात स्त्रियांसाठी लाभ
८. नियमित लसीकरण कार्यक्रम
९. स्त्रियांसाठी हायरिस्क क्लिनिक मधून तपासण्या
१०. एडस् संदर्भात कॉन्सेलींग व चाचण्या
११. मनपाच्या ५ रुग्णालयातून एमटीपी सुविधा
१२. स्तनपान सप्ताहाचे आयोजन व कार्यवाही
१३. किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी व उपचार
१४. ज्येष्ठ महिलांना निशुल्क सेवा
१५. आयसीटीसी सुविधा
१६. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा महानगरपालिकेच्या अखत्यारित एकही पोलीओचा रुग्ण आढळला नाही. अशी माहिती प्राप्त झाली.

**औरंगाबाद, महानगरपालिकेच्या आयुक्तांची साक्ष :-**

औरंगाबाद महानगरपालिकेला दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्तांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने वैद्यकीय प्रतिपूर्ती, गृह कर्ज, वाहन कर्ज, जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार या शासकीय योजना आहेत. या व्यतिरिक्त महानगरपालिकेने महिलांसाठी कोणत्या विशेष योजना सुरू केल्या आहेत ? अशी विचारणा केली.

उप आयुक्त (प्रशासन) यांनी महिलांसाठी ५ टक्के राखीव निधीतून सुरू करण्यात आलेल्या योजनांची माहिती देण्यात आली आहे असे समितीस सांगितले.

समितीने सन २००८-२००९ मध्ये रुपये २८६.१२, सन २००९-२०१० मध्ये रुपये ३३७.९८ व सन २०१०-२०११ मध्ये रुपये २८४.४० कोटीचे अंदाजपत्रक होते व या प्रत्येक वर्षी १ कोटी रुपयांची तरतूद महानगरपालिकेने महिला व बाल कल्याण विभागासाठी राखून ठेवली आहे. ही तरतूद ५ टक्के प्रमाणे बरोबर आहे का ? अशी विचारणा केली.

मुख्य लेखाधिकारी यांनी सन २००८-२००९ मध्ये रुपये २८६.१२ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक होते व त्या वर्षी ५ टक्के प्रमाणे १ कोटी १० लक्ष रुपयांची तरतूद अपेक्षित होती. महानगरपालिकेने १ कोटी रुपयांची तरतूद केली होती. तथापि, त्या वर्षी या शीर्षाखाली १ कोटी ०३ लक्ष रुपयांचा निधी खर्च झालेला आहे. अशी माहिती समितीस दिली.

समितीने महसुली व आस्थापना खर्च वगळून येणाऱ्या रकमेच्या ५ टक्के एवढी तरतूद महानगरपालिकेने केलेली नाही. अशी विचारणा केली असता आयुक्तानी शासन निर्णयामध्ये महसुली उत्पन्नाच्या ५ टक्के एवढी तरतूद करावी, असे नमूद केले आहे. त्यावर्षी प्रत्यक्ष खर्च रुपये १८४ कोटी होता. महसुली खर्च

वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमेच्या ५ टक्के एवढी तरतूद महानगरपालिकेने केली आहे. तसेच उप आयुक्त (प्रशासन) यांनी सन २००८-२००९ मध्ये २६७.४६ लक्ष, सन २००९-२०१० मध्ये रुपये २५८.८० लक्ष व सन २०१०-२०११ मध्ये रुपये २७८.७२ लक्ष महिला व बाल कल्याण यावर करण्यात आला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयाप्रमाणे ५ टक्के निधी महिला व बाल कल्याण योजनांवर खर्च झाला पाहिजे. आपली टक्केवारी काय आहे ? महसुली खर्च वजा जाता रुपये १८४ कोटी शिल्लक राहतात. त्याच्या ५ टक्के म्हणजे ९ कोटी रुपये येतात. तेवढी तरतूद महानगरपालिकेने केली का ? अशी विचारणा केली.

उप आयुक्त (प्रशासन) यांनी सन २००८-२००९ मध्ये ४.६८ टक्के, सन २००९-२०१० मध्ये १.७५ टक्के व सन २०१०-२०११ मध्ये २.९२ टक्के अशी उत्पन्नाच्या खर्चाची टक्केवारी आहे. रुपये ९ कोटी खर्च केले जात नाहीत असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयानुसार महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी बजेटच्या ५ टक्के निधी राखून ठेवला पाहिजे. महानगरपालिकेने ५ टक्के निधीची तरतूद केलेली नाही. केवळ २ टक्के, ३ टक्के व जास्तीत जास्त ४.६८ टक्के निधी या योजनांवर खर्च करण्यात आला आहे. याबाबत महानगरपालिकेने कोणतेही नियोजन केलेले नाही अशी विचारणा केली.

मुख्य लेखाधिकारी यांनी सन २००९-२०१० मध्ये रुपये ९ कोटी ऐवजी १ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सन २०१०-२०११ मध्ये १० कोटी ऐवजी १ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३ मध्ये महानगरपालिकेचे अंदाजपत्रक किती होते ? अशी विचारणा केली.

मुख्य लेखाधिकारी यांनी सन २०११-२०१२ मध्ये २९५ कोटी, सन २०१२-२०१३ मध्ये ३८० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक होते. असे समितीस सांगितले.

समितीने लेदर व कापडी बॅग तयार करण्याच्या प्रशिक्षणावर एकूण किती खर्च करण्यात आला ? अशी विचारणा केली.

महिला बाल कल्याण समितीच्या अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेच्या वतीने महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विविध प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले होते. सन २००८ ते २०११ या कालावधीत लेदर व कापडी बॅग तयार करणे, फॅशन डिझायनिंग व एमएस-सीआयटीचे प्रशिक्षण देण्यात आले होते. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक वॉर्डमधील ४ लाभार्थी निवडण्यात आले होते. तसेच आयुक्तांनी महानगरपालिकेने "फिनिक्स" प्रकल्पांतर्गत स्वयंसेवी संस्था व एमसीईडी यांच्यामार्फत "हाऊस किपींग प्रशिक्षण" वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी आयोजित केले असून यामध्ये एकूण ४१९ महिलांनी प्रशिक्षण घेतले आहे. फिनिक्स प्रकल्पांतर्गत वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना प्रशिक्षण देवून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले असून यामध्ये एकंदर ४२९ महिलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या महिलांचे बचतगट तयार करून त्यातील ४२ महिलांना महानगरपालिकेच्या विविध वार्डात कामे देण्यात आली आहेत. असे समितीस सांगितले.



समितीने महिला बचत गटांकडून कापडी बॅगा तयार करण्यासाठी एकंदरीत किती खर्च आला, तसेच बचत गटांकडून कोणकोणती कामे करून घेतली जातात ? अशी विचारणा केली.

महिला बाल कल्याण समितीच्या अधिकाऱ्यांनी कापडी बॅगा तयार करण्यासाठी रुपये २,९६,४०० खर्च आला असून यामध्ये ३१२ लाभार्थ्यांचा समावेश आहे. फॅशन डिझाईनसाठी रुपये ८,८६,४०० खर्च झालेला आहे. फॅशन डिझाईनसाठी ३१२ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून हा खर्च लाभार्थ्यांच्या प्रशिक्षणावर झालेला आहे. फॅशन डिझाईनिंगसाठी १२ ठिकाणी प्रशिक्षण ठेवण्यात आले होते. ३१२ लाभार्थ्यांपैकी ८० महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. प्रत्येक वॉर्डमधून ३-३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये एकंदर ९९ नगरसेवक असून ५ सदस्य स्वीकृत सदस्य आहेत. असे समितीस सांगितले.

उप आयुक्त (प्रशासन) यांनी केरळ येथील अभ्यास दौऱ्यासाठी रुपये ८ लक्ष खर्च झालेला आहे. बचत गटांना पिठाच्या गिरण्या दिल्या असून पिठाच्या गिरणीसाठी रुपये १९,५००/- खर्च झालेला आहे. असे समितीस सांगितले.

आयुक्तांनी माननीय महापौरांच्या पुढाकाराने मुलीचा जन्मदर वाढण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती. सन २०११ मध्ये मुलींचे प्रमाण हजारी ८५० होते ते आता ९०० च्या वर गेलेले आहे. गैरमार्गाने लिंगनिदान करणाऱ्या रेडिओलॉजिस्टवर कारवाई सुध्दा करण्यात आलेली आहे. या वर्षी माननीय मीनाताई ठाकरे यांच्या नावाने महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये जन्म घेणाऱ्या मुलींच्या नावे रुपये २० हजार टाकले जातात. सदर मुलगी १८ वर्षाची झाल्यानंतर तिला रुपये १ लक्ष मिळणार आहेत. या पैशाचा उपयोग मुलीच्या शिक्षणासाठी आणि लग्नासाठी व्हावा अशी या योजनेमागील भूमिका आहे. महानगरपालिका महिलांसाठी नेहमीच चांगल्या योजना राबावित आलेली आहे असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

औरंगाबाद महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने माजी माननीय उप महापौर यांनी समितीला एक पत्र दिलेले असून, सदर पत्रात महिला व बालकल्याण निधीतून रात्रनिवारा योजना पुरुषांसाठी करण्यात आली आहे, ती महिलांसाठी देखील असली पाहिजे सदर योजनेच्या माध्यमातून महिलांसाठी रात्रनिवारा का उपलब्ध करून देण्यात आलेला नाही ? प्रथम महिलांसाठी सदर योजना राबाविण्याची गरज आहे. परंतु, या ठिकाणी उलट कार्यवाही केल्याचे दिसून येत आहे. अशी विचारणा केली.

आयुक्तांनी सद्यःस्थितीत रात्रनिवारा योजना सुरू झालेली आहे, त्यात महिलांसाठी एक वेगळा विभाग असावा अशा प्रकारची विनंती केली जाणार आहे असे समितीस सांगितले.

समितीने संबंधित अधिकाऱ्यांनी संबंधितांना महिलांसाठी एक वेगळा कक्ष असावा अशा प्रकारचे आदेश देण्याची गरज आहे. पुरूषांसाठी रात्रनिवारा असेल तर शासन निर्णयानुसार महिलांसाठी ३० टक्के रात्रनिवारा उपलब्ध करून दिलाच पाहिजे, अशी समितीची आग्रही मागणी आहे. तसेच महिला व बालकल्याण निधीतून रात्रनिवारा योजना सुरू करण्यात आल्याची माहिती माजी माननीय उप महापौर यांनी समितीला पत्राद्वारे दिलेली आहे अशी सूचना केली.

आयुक्तांनी ज्या विभागातून महिलांची अशा प्रकारची मागणी आली असेल तर, अशा ठिकाणी महिलांची सोय प्राधान्याने करण्यात यावी अशा प्रकारचे आदेश आजच्या साक्षीच्या बैठकीच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांना दिले जातील असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने औरंगाबाद महानगरपालिका येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने सन २००८-२००९ मध्ये ५टक्के प्रमाणे १ कोटी १० लक्ष रुपयांची तरतूद अपेक्षित होती. महानगरपालिकेने १ कोटी रुपयांची तरतूद केली होती. तथापि, त्या वर्षी या शीर्षाखाली रुपये १ कोटी ०३ लक्षचा निधी खर्च झालेला आहे. सन २००८-२००९ मध्ये ४.६८टक्के, सन २००९-२०१० मध्ये १.७५टक्के व सन २०१०-२०११ मध्ये २.९२टक्के अशी उत्पन्नाच्या खर्चाची टक्केवारी आहे. सन २०११-२०१२ मध्ये २९५ कोटी, सन २०१२-२०१३ मध्ये ३८० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक होते. कापडी बॅग तयार करण्यासाठी रुपये २,९६,४०० खर्च आला असून फॅशन डिझाईनसाठी रुपये ८,८६,४०० खर्च झालेला आहे. मीनाताई ठाकरे यांच्या नावाने महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये जन्म घेणाऱ्या मुलींच्या नावे रुपये २० हजार ठेवले जातात. सदर मुलगी १८ वर्षाची झाल्यानंतर तिला रुपये १ लक्ष मिळणार आहेत. सद्यःस्थितीत पुरूषांसाठी रात्रनिवारा योजना सुरू झालेली आहे.

समितीला औरंगाबाद महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकीय रकमेबाबतची लेखी स्वरुपातील प्राप्त झालेली माहिती तसेच भेटीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती विचारात घेता औरंगाबाद महानगरपालिकेद्वारे शासन निर्णयानुसार विविध योजना राबविल्या आहेत असे दिसून येते. तथापि, शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या एकूण वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदींपैकी (महसुली व आस्थापना खर्च वजा जाता) ५टक्के निधीची तरतूद महिलांच्या सबलीकरणासाठी तसेच विविध योजना राबविण्यासाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे. परंतु या महानगरपालिकेने या शासन निर्णयाचे पालन केले नाही असे एकंदरीत सादर केलेल्या माहितीवरुन दिसून येते. **शासन निर्णयाप्रमाणे महिलांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरिता त्या त्या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नापैकी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे ५टक्के रक्कम राखून ठेऊन शासनाच्या शासन निर्णय दिनांक ८ नोव्हेंबर २०१० रोजीच्या निर्णयानुसार विविध योजनांवर खर्च करणे बंधनकारक आहे. या शासन निर्णयाचे महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून उल्लंघन झाले आहे असे समितीला प्रथमदर्शनी आढळून आले आहे. सबब, सन २००८-०९ ते सन २०१०-११ या कालावधीत महानगरपालिकेचे त्या त्या वर्षाचे एकूण अंदाजपत्रकीय उत्पन्नापैकी (महसुली व आस्थापना खर्च वजा जाता) ५टक्के रक्कम दिनांक ८ नोव्हेंबार २०१० रोजीच्या शासन निर्णयाच्या**



**अनुषंगाने विविध योजनांवर खर्च केली आहे किंवा कसे? याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांची सर्वंकष चौकशी करून त्यात ते दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.४ महानगरपालिका क्षेत्रात असलेले शॉपिंग गाळे :-**

समितीने महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या मालकीचे मंडई/बााजार यांची संख्या किती आहे? त्यात एकुण किती गाळे आहेत? त्यातील किती गाळे महिलांना वितरित करण्यात आले आहेत? अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी औरंगाबाद, महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

महानगरपालिकेच्या मालकिच्या एकूण २६ व्यापारी संकुलातील दुकान गाळ्यांची संख्या ४९६ असून त्यापैकी ५८ दुकाने महिलांना दिलेली आहेत. शहरांत २ भाजी मंडई असून ते औरंगपुरा व शहागंज येथे आहेत. शहागंज भाजी मंडईचे अद्ययावत भाजी मंडई/व्यापारी संकुल जूने असल्यामुळे त्याचे बांधकाम करण्यात येत आहे. औरंगपुरा भाजी मंडई वापरात आहे.

महानगरपालिकेतर्फे स्थानिक वर्तमान पत्रातून निविदा मागविण्यात येऊन गाळे भाडे तत्वावर देण्यात येतात. जुने व्यापारी संकुल वगळता महिलांसाठी ३० टक्के दुकाने राखीव ठेवण्यात येतात. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंचे विक्रिचे धोरण आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत जय टॉवर येथील तळघरातील ४१ गाळे भाडेतत्वावर ३० वर्षासाठी घेण्यात आले आहे. गाळे नादुरूस्त असल्याने बचत गटांना गाळे दिलेले नाहीत. दुरुस्त झाल्यास लवकरात लवकर बचत गटांना गाळे देण्याची कार्यवाही चालू आहे. बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी गाळे उपलब्ध करून दिली जातील.

**औरंगाबाद, महानगरपालिकेच्या आयुक्तांची साक्ष :-**

औरंगाबाद महानगरपालिकेला दिनांक ११ जुलै २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्तांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने बांधलेल्या एकूण गाळ्यांपैकी ३० टक्के गाळे महिला बचत गटांना देणे आवश्यक असूनही औरंगाबाद महानगरपालिकेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील गाळे लिलावाने विक्री करताना त्यात महिलांचा विचार का करण्यात आला नाही. यावर शासन निर्णय तसेच गाळे लिलावाचे निकष सादर करावे. अशी सूचना केली.

आयुक्तांनी सिडको-हडको वासियांची तसेच शहरातील क्रीडाप्रेमींची मागणी लक्षात घेऊन सिडको एन-१०, टी.व्ही.सेंटर येथील क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या मोकळ्या जागेवर सुसज्ज असे स्टेडियम/कॉम्प्लेक्स उभारण्याचा प्रकल्प महानगरपालिकेने हाती घेतलेला आहे. या प्रकल्पात एकूण ५० दुकानांचे गाळे बांधण्यात आले आहेत. महिला उद्योजकांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून ३० टक्के प्रमाणे ५० दुकानांपैकी १५ दुकाने महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आली होती व या दुकांनाचे वाटप

महिलांना करण्यात आले आहे. सदरचे वाटप करण्यासाठी महिलांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यासाठी ३५० अर्ज महानगरपालिकेला प्राप्त झाले होते व अधिकतम दराच्या निविदा अंतिम करण्यात आल्या आहेत असे समितीस सांगितले.

समितीने निविदा कशासाठी मागविण्यात आली होती? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी डिपॉझिट व मासिक भाडे गाळेधारकांकडून घेण्यात येणार आहे. डिपॉझिटसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. ज्या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत, त्यांचे डिपॉझिट व्हेव करण्यात आले आहे असे समितीस सांगितले.

समितीने महिला नगरसेविकांनी अशी मागणी केली पाहिजे की, प्रत्येक प्रभागामध्ये शॉपिंग सेंटर बांधली जावीत व त्याच प्रभागातील महिलांना गाळ्यांचे वाटप करावे. यासाठी निकष कोणते असावेत, याचा निर्णय घ्यावा. अशी सूचना केली असता आयुक्तांनी छोटे छोटे शॉपिंग सेंटर बांधले गेले आणि त्यामधील गाळे महिलांना दिले गेले तर अनेक महिलांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. महानगरपालिकेने एक शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधला आहे. परंतु, तेथील गाळे लिलावाने देण्यात आले आहेत. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे त्या लिलावात स्पर्धा करू शकत नाहीत. तसेच या महानगरपालिकेत महिलांसाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात. बचतगट, महिलांसाठीचे उद्योग, शॉप्स असे वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात. माननीय महापौरांच्या अध्यक्षतेखाली शहरातील मोक्याच्या ठिकाणी शॉपींग सेंटर, स्टेडियम यातील ५० पैकी ३० गाळे महिलांसाठी राखीव आहेत. यामुळे महिलांच्या आर्थिक परिस्थितीत सुद्धा वाढ झालेली आहे असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

औरंगाबाद महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबार २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने बांधलेल्या एकूण गाळ्यापैकी ३० टक्के गाळे महिला बचत गटांना देणे आवश्यक असूनही औरंगाबाद महानगरपालिकेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील गाळे लिलावाने विक्री करताना त्यात महिलांचा विचार का करण्यात आला नाही. याबाबत शासन निर्णय तसेच गाळे लिलावाचे निकष सादर करावे? सदरहू शासन निर्णय कधीचा आहे? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी लिलावाच्या माध्यमातून गाळ्यांची विक्री केली जाते. समितीने केलेल्या सूचनेनुसार आरक्षणाच्या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे. लिलावाच्या माध्यमातून गाळ्यांची विक्री केली जाते. असे समितीस सांगितले.

समितीने लिलाव पद्धतीने महिलांसाठी ३० टक्के राखून ठेवण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भातील दिनांक २२ नोव्हेंबर २००१ रोजीचा शासन निर्णय असून, त्याची माहिती समितीला द्यावी. अशी सूचना केली.



आयुक्तांनी जुन्या कॉम्प्लेक्समधील गाळ्यांची विक्री झालेली आहे. परंतु, सद्य:स्थितीत जे कॉम्प्लेक्स आहेत, त्यात महिलांसाठी ३० टक्के गाळे राखून ठेवण्याबाबत आरक्षण निश्चित केलेले आहे. शहागंज मार्केट जवळील सिद्धार्थ गार्डनजवळ एक कॉम्प्लेक्स आहे. तसेच दुसरे कॉम्प्लेक्स पैठण गेटजवळ आहे. त्याच्यासमोर जी पार्किंगची व्यवस्था आहे, त्याच्यासमोर जुने कॉम्प्लेक्स आहे. संबंधित कॉम्प्लेक्सला वेगळे असे नाव नाही. ते फार जुने कॉम्प्लेक्स आहेत. सद्य:स्थितीत त्याला २५ वर्षांचा कालावधी उलटून गेलेला आहे. तसेच महानगरपालिकेने बांधलेल्या शॉपिंग सेंटरमध्ये गाळ्यांच्या बाबतीत स्वतंत्र आरक्षण ठेवण्यात आलेले नाही तथापि, यानंतर नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधल्यास शासनाचे मार्गदर्शन घेऊन सर्वसाधारण सभेपुढे धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव सादर केला जाईल. असे समितीस सांगितले.

समितीने कॉम्प्लेक्सची नावे काय आहेत? कोणत्या कॉम्प्लेक्समध्ये महिलांसाठी गाळे आरक्षित करण्यात आले आहेत? त्यावेळी महिलांसाठी गाळे राखून का ठेवण्यात आले नाही? औरंगाबाद महानगरपालिकेने सन २००१ नंतर नवीन गाळे बांधले नाहीत काय? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी शहागंज मार्केट जवळील सिद्धार्थ गार्डनजवळ एक कॉम्प्लेक्स आहे. तसेच दुसरे कॉम्प्लेक्स पैठण गेटजवळ आहे. त्याच्यासमोर जी पार्किंगची व्यवस्था आहे, त्याच्यासमोर जुने कॉम्प्लेक्स आहे. त्याला पैठण गेट असे म्हणतो. ते फार जुने कॉम्प्लेक्स आहेत. सद्य:स्थितीत त्याला २५ वर्षांचा कालावधी उलटून गेलेला आहे. महानगरपालिकेने बांधलेल्या शॉपिंग सेंटरमध्ये गाळ्यांच्या बाबतीत महिलांसाठी स्वतंत्र आरक्षण ठेवण्यात आलेले नाही. तथापि, यानंतर नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधल्यास शासनाचे मार्गदर्शन घेऊन सर्वसाधारण सभेपुढे धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव सादर केला जाईल. औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत जे नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधले जात आहेत, त्यात महिलांसाठी ३० टक्के नुसार गाळे आरक्षित करण्यात आले आहेत. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीला औरंगाबाद महानगरपालिकेकडून लेखी स्वरुपात प्राप्त झालेल्या माहितीनुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या एकूण २६ व्यापारी संकुलातील दुकान गाळ्यांची संख्या ४९६ असून त्यापैकी ५८ दुकाने महिलांना दिलेली आहेत. शहरात २ भाजी मंडई असून ते औरंगपूरा व शहागंज येथे आहेत. शहागंज भाजी मंडईचे अद्ययावत भाजी मंडई/व्यापारी संकुल जुने असल्यामुळे त्याचे बांधकाम करण्यात येत आहे. औरंगपुरा भाजी मंडई वापरात आहे. महानगरपालिकेतर्फे स्थानिक वर्तमान पत्रातून निविदा मागविण्यात येऊन गाळे भाडे तत्वावर देण्यात येतात. जुने व्यापारी संकुल वगळता महिलांसाठी ३० टक्के दुकाने राखीव ठेवण्यात येतात. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंचे विक्रिचे धोरण आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत जय टॉवर येथील तळघरातील ४१ गाळे भाडेतत्वावर ३० वर्षांसाठी घेण्यात आले आहेत. गाळे नादुरूस्त असल्याने बचत गटांना गाळे दिलेले नाहीत. दुरुस्त झाल्यास लवकरात लवकर बचत गटांना गाळे देण्याची कार्यवाही सुरू आहे. बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंची विक्री करण्यासाठी गाळे उपलब्ध करून दिले जातील.

उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने आयुक्त महानगरपालिका यांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी आयुक्तांनी सिडको-हडको वासियांची तसेच शहरातील क्रीडाप्रेमींची मागणी लक्षात घेऊन सिडको एन-१०, टी.व्ही.सेंटर येथील क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या मोकळ्या जागेवर सुसज्ज असे स्टेडियम/कॉम्प्लेक्स उभारण्याचा प्रकल्पात एकूण ५० दुकानांचे गाळे बांधण्यात आले आहेत. महिला उद्योजकांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून ३० टक्के प्रमाणे ५० दुकानांपैकी १५ दुकाने महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आली होती. शहरातील मोक्याच्या ठिकाणी शॉपींग सेंटर, स्टेडियम यातील ५० पैकी ३० गाळे महिलांसाठी राखीव आहेत अशी माहिती समितीस दिली. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी जुन्या कॉम्प्लेक्समधील गाळ्यांची विक्री झालेली आहे. परंतु, सद्यःस्थितीत जे कॉम्प्लेक्स आहेत, त्यात महिलांसाठी ३० टक्के गाळे राखून ठेवण्याबाबत आरक्षण निश्चित केलेले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत जे नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधले जात आहेत, त्यात महिलांसाठी शासन निर्णयानुसार ३० टक्के नुसार गाळे आरक्षित करण्यात आले आहेत अशी माहिती समितीस विदित केली.

उपरोक्त माहिती विचारात घेता औरंगाबाद महानगरपालिकेने एकूण बांधलेल्या गाळ्यांपैकी व त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या गाळ्यांमधून ३० टक्के गाळे महिलांसाठी आरक्षित ठेवले जातात याबाबत समिती समाधान व्यक्त करते. शासनाच्या नगरविकास विभागाच्या शासन परिपत्रक क्र.संकिर्ण १०/२००१/ ६६/ प्र.क्र.२२/ न.वि.-२७ दिनांक २२ नोव्हेंबर २००१ रोजीच्या परिपत्रकात असे नमूद केले आहे की, शासनाच्या महिला धोरणाच्या अनुषंगाने नगरपरिषदा/महानगरपालिकांनी शहरी सुवर्ण जयंती रोजगार अंतर्गत महिलांच्या स्वयंसहाय्यिता गटांची स्थापना वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य देण्यात यावे. यामध्ये आदिवासी महिला, मागासवर्गीय आपदग्रस्त आणि शहरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात यावा यासाठी महिला व त्यांच्या गटांसाठी नगरपरिषदा व महानगरपालिकांमार्फत निर्माण करण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलातील वितरित होणाऱ्या गाळ्यांपैकी ३० टक्के गाळे महिलांच्या स्वयंसहाय्यित गटासाठी राखून ठेवण्यात यावे व त्याचे वाटप संबंधित गटात होईल याची दक्षता घेण्यात यावी. असे गाळे वाटप करताना गाळे बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम मोबदला स्वरुपात ना नफा ना तोटा या तत्वात घेऊन गाळे हस्तांतर करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

**महानगरपालिकेच्या आयुक्तांनी तसेच विभागीय सचिवांनी समितीला महिलांना गाळे वाटप केले असल्याचे सांगितले आहे. तथापि, उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार सदरचे गाळे आदिवासी महिला, मागासवर्गीय आपदग्रस्त आणि शहरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला किंवा कसे हे नमूद केलेले नाही. त्यामुळे या शासन निर्णयाचा उद्देश सफल झाला आहे किंवा कसे हे दिसून येत नाही. सबब, समिती अशी शिफारस करते की, महानगरपालिकेने बांधलेले व वाटपाविना शिल्लक असलेले जुने तसेच नवीन गाळ्यांपैकी ३० टक्के गाळे हे उपरोक्त नमूद केलेल्या नगर विकास विभागाच्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार वितरित करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

---

# परिशिष्ट - "अ"
# शासन निर्णय

---

# परिशिष्ट - “ब”
# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त



**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**गुरुवार, दिनांक १० जुलै २०१४**
**स्थळ : औरंगाबाद, जिल्हा परिषद**

**उपस्थिती**

(१) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.

(३) श्रीमती शामल बाागल, वि.स.स.

(४) श्रीमती मिरा रेंगे-पाटील, वि.स.स.

(५) डॉ.संजय रायमुलकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव.

**जिल्हा परिषद, औरंगाबाद**

(१) श्री. दिपक चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. संभाजी लांगोरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. एस. व्ही. शिंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)
(४) श्री. वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
(५) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(६) श्री. जयश्री सोनकवडे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(७) श्री. एम. एल. साळवे, समाजकल्याण अधिकारी
(८) श्री. सिताराम कोलते, कृषि विकास अधिकारी
(९) श्री. मधुकर देशमुख, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१०) श्री. भगवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(११) श्री. भारतकुमार बााविस्कर, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
(१२) श्री. दीपक द. सोंदनकर, कार्यकारी अभियंता (सिंचन)
(१३) श्री. गजानन बा. रबडे, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)
(१४) डॉ. विवेक खतगांवकर, जिल्हा आरोग्य अधिकारी
(१५) श्री. संजय कदम, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी
(१६) श्री. उमेश कहाते, जि.स.अधिकारी, माविम
(१७) श्री. एम. पी. सुरडकर, उप अभियंता (यां).

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**शुक्रवार, दिनांक ११ जुलै २०१४**

**स्थळ : औरंगाबाद, महानगरपालिका**

**उपस्थिती**

(१) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.

(३) श्रीमती शामल बाागल, वि.स.स.

(४) श्रीमती मिरा रेंगे-पाटील, वि.स.स.

(५) डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स.

(६) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव.

**स्थानिक लोकप्रतिनिधी**

(१) श्रीमती किर्ती शिंदे, नगरसेविका

(२) श्रीमती रेखा पाटील, नगरसेविका

(३) श्रीमती साधना सुरडकर, नगरसेविका

(४) श्रीमती प्राजक्ता भाले, नगरसेविका

(५) श्रीमती सुनिता सोनवणे, नगरसेविका

(६) श्रीमती सविता कुलकर्णी, नगरसेविका

**औरंगाबाद महानगरपालिका**

(१) डॉ. हर्षदीप कांबळे, आयुक्त

(२) श्री. किशोर बोर्डे, उप आयुक्त(महसूल)

(३) श्री. रविंद्र निकम, उप आयुक्त(प्रशासन)

(४) श्री. सखाराम पानझडे, शाखा अभियंता

(५) श्री. अशोक थोरात, मुख्य लेखाधिकारी

(६) श्री. शिवाजी झनझन, कर निर्धारक संकलक

(७) श्री. प्रमोद खोब्रागडे, नगर सचिव,



(८) श्रीमती प्रेमलता कराड, म.बा.क.स.,क्ष

(९) डॉ. निता पाडळकर, अध्यक्ष, महिला तक्रार निवारण प्रमुख

(१०) श्री. अफसर सिद्दीकी, कार्यकारी अभियंता

(११) श्री. सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता

(१२) श्री. ए. एम. शेख, शिक्षणाधिकारी

(१३) श्री. भालचंद्र पैठणे, आस्थापना अधिकारी

(१४) श्री. एम. एफ. पाटणी,आस्थापना अधिकारी

(१५) श्री. एस. के. जोशी, प्रकल्प संचालक

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(७) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(८) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(९) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(२) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(३) श्रीमती मा. म. सुर्वे, कक्ष अधिकारी

**महिला व बालकल्याण विभाग**

श्री. संजय कुमार, प्रधान सचिव

**गृह विभाग**

श्री. रजनिश सेठ, प्रधान सचिव (विशेष)

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

श्री. एस. एस. संधू, प्रधान सचिव

**ग्रामविकास विभाग**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव

**शालेय शिक्षण विभाग**

श्री. नंद कुमार, प्रधान सचिव

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

(१) श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव

(२) डॉ. सतीश पवार, संचालक आरोग्य सेवा

**नगरविकास विभाग**

श्रीमती मनिषा म्हैसकर, सचिव

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

श्री. पी.जी.गणवीर, सचिव

**सामान्य प्रशासन विभाग**

श्री. प्रमोद त्र्यं. नलावडे, सचिव

**सामाजिक न्याय विभाग**

श्री. उ. शि. लोणारे, सह सचिव

**विभागीय अधिकारी**

(१) श्री. प्रकाश महाजन, आयुक्त, औरंगाबाद

(२) डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद.



**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**बुधवार, दिनांक ६ एप्रिल २०१६**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**समिती प्रमुख**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(७) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(८) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(९) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्रीमती मा. म. सुर्वे, कक्ष अधिकारी

समितीने उक्त बैठकीत जिल्हा परिषद, औरंगाबाद व औरंगाबाद महानगरपालिका येथे दिलेल्या भेटीच्या संदर्भात प्रारुप अहवालावर विचार विनिमय करून तो संमत केला.

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**